## प्रकरण चौथे

।। "धागे आडवे उभे" मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये" ।।

## प्रकरण चौथे

## ।। "धागे आडवे उभे" मधील आशय व अभिव्यक्तीची वैशिष्ट्ये. ।।

प्रस्तुत लघुप्रबंधाच्या या प्रकरणात अनिल अवचटांच्या "ललित गद्याची वैशिष्टये", "धागे आडवे उभे" या पुस्तकाच्या आधारे आशय व अभिव्यक्तीच्या संदर्भात कशी आविष्कृत झाली आहेत, याचा विचार करणार आहोत.

"धागे आडवे उभे" हे अनिल अवचटांचे पुस्तक १९८६ मध्ये मॅजेस्टिक प्रकाशनने प्रसिध्द केले आहे. "माणसं" १९८० मध्ये प्रकाशित झालेले, म्हणजे जवळ जवळ दोन दशक हा लेखक "माणसं" हा केंद्रबिंदू मानून मानवी जीवनमूल्यांचा शोध घेताना उपऱ्या, दुर्लक्षित, सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणा-या मानवसमूहांचे चित्र रेखाटताना दिसतो. मानवसमूहाचे हे चित्र रेखाटताना मूल्यांचा शोध घेणारा सखोल लेखन प्रवास "धागे आडवे उभे" मध्येही चालू असलेला दिसतो.

### मुखपृष्ठ, शीर्षक, रेखाचित्र यातून लेखकाच्या जाणिवेची सूचना :-

अवचटांनी "धागे आडवे उभे" च्या "चार शब्द"[१] या प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे हे त्यांचे दहावे पुस्तक आहे. "माणसं" हा अडुसष्ट पासूनचा त्यांच्या लिखाणाचा, चिंतनाचा विषय आहे. त्यामुळे याही पुस्तकात "मानवसमूहांच्या" स्थितीचे विस्तृत असे चित्र रेखाटले आहे.

#### मुखपृष्ठ :-

मुखपृष्ठावरील चित्रावरून आडव्या उभ्या, पण विस्कटलेल्या धाग्यांतून "मानवी चेह-याचे दर्शन घडते की जो चेहरा या फाटक्या माणसांच्या, फाटक्या आयुष्याचे प्रतिनिधित्व करतो. अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज, सामाजिक अन्याय अशा प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये सामान्य माणसाच्या जीवनाची वीण उलटसुलट होत आहे. "ब-याच ठिकाणी गुंतागुंती

होत आहेत· काही स्तरांचे प्रश्न उग्र होत आहेत· काहींचे जीवन तर धागे तुटल्यासारखे उद्ध्वस्त होत आहे·"[२] या अवचटांच्या लेखन विचाराचेच सूत्र मुखपृष्ठावरील चित्रामध्ये सुभाष अवचटांनी रेखलेले आहे·

संपूर्ण पुस्तकाच्या कव्हर पेजला पिवळा रंग उपयोजून "हळद कामगार", "पिवळया साहित्यां"च्या शोषित "वेश्या, 'देवदासी" या विषयासंबंधीची पुस्तकातील लेखांची खूप मोठी सूचकता व्यक्त केली आहे· मानसिक विकृती शांत करण्यासाठी "पिवळया कव्हरच्या" पुस्तकांचा आधार घेणाऱ्या व या "पिवळे साहित्य" कल्पनेला छेद देणारा विचार या लिखाणात असल्याची जाणीव होते· पोटासाठी शरीर, श्रम विकणाऱ्यांच्या वेदना आणि व्यथा वाचकांसमोर मांडत असतानाच, शोषणकर्त्यांच्या मनातील "भोगण्याचीच वस्तू" आहे ही "कावीळ" दूर करून, दुर्लक्षितही "माणसंच" आहेत, त्यांच्याकडे आपणही माणसं म्हणून पहाणे आवश्यक आहे हेच त्यांना त्यांच्या लेखनातून अभिव्यक्त करावयाचे आहे· "हळद" मांगल्य सुचवणारी, पण अज्ञान, दारिद्र्य, शोषण, माणुसकीचा अभाव त्यामुळे या गांजलेल्या कामगारांचे, पददलित स्त्रियांचे आयुष्याचे वस्त्र काटेरी बनते आहे, असे समर्पक (कव्हर पेज) मुखपृष्ठ या पुस्तकाला लाभले आहे·

**शीर्षक :-**

"धागे आडवे उभे" या शीर्षकामध्ये लेखकाने लालित्य साधले आहे· "धागे उभे आडवे" "आडवे उभे धागे" अशी शब्दरचना सुध्दा कलाकृतीचा ताल चुकवणारी ठरली असती· अवचटांची "शीर्षके" ही वैशिष्टयपूर्ण असतात· शीर्षके स्वतःच लेखाचा ताल, लय, घेवून आकर्षकपणे वाचकांकडे येतात, येताना समतोल विचार घेऊन येतात, समाजातील "असमतोल" दर्शवतात· "माणूस" हाच त्यांच्या लेखनाचा, चिंतनाचा गाभा असतो, हे शीर्षकातूनच वाचकाला जाणवते·

**रेखाचित्र :-**

पुस्तकामधील रेखाचित्रे सुभाष अवचटांनी लेखातील विषयांना अनुसरून काढली आहेत· रेखाचित्रे प्रत्येक लेखाच्या सुरूवातीला दिली आहेत· विषयांना पूरक अशी आठ रेखाचित्रे आहेत·

"वस्त्या वेश्यांच्या", "पैंजण नव्हे बेडया" या लेखासाठी अनुक्रमे वेश्या, तमासगीर स्त्री तर "देवाची माणसं"साठी डोकीवर जग, अंगावर लिंब बांधलेल्या देवदासी स्त्रीचे चित्र रेखाटले आहे. "धागे आडवे उभे", "गर्द पिवळे जग", "एक अंधारातले जग" लेखांसाठी कामगारांची चित्रे रेखाटली आहेत.

अर्पण पत्रिका :-

"यातना यंत्रात सापडलेल्या मानवसमूहांना "[१]

पुस्तक अर्पण करून लेखक या दुर्लक्षित यातनायंत्रात सापडलेल्या मानवसमूहांच्या दुःखाला या समाजाचे एक घटक म्हणून आपण जबाबदार आहोत ही अपराधीपणाची भावना व्यक्त करतो. या लेखांतून तो माणसांतील आत्मविश्वास जागा करू इच्छितो. यातनाचक्राला थांबवण्याचे विचार या लेखांतून मांडतानाही प्रामाणिक मनाची शब्दबध्द केलेली भावना या मानवसमूहाला अर्पण करतो.

प्रस्तावना :-

"चार शब्द" अशी अनिल अवचटांची स्वतःची प्रस्तावना आहे. त्यांच्या प्रस्तावनेतील भूमिकेने अर्पण पत्रिकेतला धागा अधिक पिळदार बनतो. अवचटांच्या सुरुवातीच्या लिखाणातून येणारे सामाजिक विषय, घटना, प्रसंग, त्या संबंधीच्या त्यांच्या मनातल्या प्रतिक्रिया , कधी स्थळांना भेट देऊन लिहिलेले रिपोर्ताज असा त्यांच्या लेखनाचा प्रवास होता. त्याही लिखाणात "माणूस" "मानवता" हा केंद्रबिंदू होता. समाजपरिघाबाहेरील लोकांची ओळख करून घ्यावी हा उद्देश होता. खूप भटकून समाज पाहिल्यानंतर लेखकाच्या लक्षात असे आले आहे की हे परंपरागत शोषण, दारिद्र, अत्याचारग्रस्त जीवन विशिष्ट मानवसमूहाच्या वाटयाला सतत आलेले आहे ते का ? व कसे ? माणूस म्हणून आपण किती जबाबदार आहोत. हेच जीवन जर आपल्या वाटयाला आले असते तर आजची आपली कर्तबगारी, बुध्दिमत्ता आपल्याला लाभली असती का ? एक क्षणभर जरी आपण विचार केला तर त्या माणसांच्या निर्मितीचा आनंद, जगण्याची उर्मी नष्ट होण्याला आपण व आपला समाजच कारणीभूत आहे. सामाजिक परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडून होणारे माणूसपणाचे खून आपण सहज पहात रहातो किंवा पहायचे नाकारतो या वांझोट-पणाची चीड अनिल अवचट व्यक्त करतात.

दुसरा एक महत्त्वाचा विचार त्यांनी मांडला आहे· "जी दुःखं मनुष्य-निर्मित आहेत, त्यांचा निरासही तो करू शकतो"[४] या विचाराने अवचटांचा आत्मविश्वास वाढतो· त्यांना अप्पलपोटी, स्वार्थी, स्वतःच्या प्रगतीपलिकडे जीवनाची कल्पना न जाऊ देणारा माणूस म्हणजे सापशिडयांचा खेळ खेळणारा गडी वाटतो. त्याला ते धोक्याची सूचना देतात· हा खेळ फार काळ चालणार नाही, झोपडपट्टी, वेश्या वस्त्या, पददलित, हिंसाचार व्यापलेल्या वस्त्या समाजात वाढू लागल्या की हा प्रगतीचा खेळ सापाच्या तोंडात जाईल, संपूर्ण समाजजीवन उद्ध्वस्त होईल, त्यासाठी हा खेळच नाकारला पाहिजे· 'सर्वांसह प्रगती' हे तत्त्व स्वीकारून संपूर्ण समाजाला घेऊन एक चांगले, निर्भर, आनंदी, अभिमान वाटेल असे जीवन जगले पाहिजे, समाजातील सुजाण सुशिक्षित तरूणांनी हे परिवर्तनाचे काम आवाहन म्हणून स्वीकारले पाहिजे, हे आग्रही विचार पुढील साऱ्या लेखांतूनही मांडलेले आहेत·

प्रस्तावनेतील "ज्या ज्या वेळी स्वतःच्या कर्तृत्वाविषयी मनात विचार येतात··· माणसाच्या खुनापेक्षाही भयंकर वाटते·"[५] विचाराचे तरंग माणसांच्या मनात उमटविणारे अवतरण पुस्तकाच्या मलपृष्ठावर छापले असल्याने पुस्तकाला अधिक उठाव आला आहे·

या प्रस्तावनेत "लेखनामागील त्यांच्या प्रेरणा स्पष्ट आहेत· मराठी साहित्याच्या दृष्टीने त्या स्वागतार्ह आहेत·"[६] असे अंजली सोमण नमूद करतात·

प्रस्तावनेत पुढील विषयांची विचारसूत्रे मांडलेली आहेत·

## आशयदृष्ट्या वैशिष्ट्यांचा विचार :-

### समाजजीवनाचा आरसा :-

"धागे आडवे उभे" मधील १) वस्त्या वेश्यांच्या, २) एक अंधारातलं जग, ३) पैंजण नव्हे बेडया, ४) जर्द पिवळे जग, ५) देवाची माणसं, ६) धागे आडवे उभे· या सहा लेखांत सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणाऱ्या मानवसमूहांच्या स्थितीचे चित्रण केले आहे· या समूहातील ही माणसें समाजपरिघापलिकडचे जीवन समाजात राहून भोगत असतात· त्या माणसांच्या हलाखीच्या परिस्थितीचे आडवे उभे आलेख म्हणजे हे लेख आहेत, त्यात समाजजीवनाचे प्रतिबिंब वाचकाला दिसते·

या लेखांमधील वेश्या, थिएटर कामगार, हळद कामगार, यंत्रमाग कामगार हे शहरी तर देवदासी, तमासगीर स्त्री, हे ग्रामीण समाजरचनेतील सामाजिक, आर्थिक, शारीरिक, मानसिक अत्याचारग्रस्त असे समूह आहेत· त्यामुळे "धागे आडवे उभे" ग्रामीण व शहरी जीवनाचा आरसा बनले आहे· या सामाजिक अन्यायात ग्रामीण, शहरी भागातील स्त्री-पुरूष दोघेही आहेत· लहान मुलेही आहेत·

समाजातील उच्चभ्रू, व्यापारी या स्त्रियांना, कामगाराला त्याचे दाम मिळू देत नाहीत, पंच्याहत्तर रूपये किंमतीच्या धोतरपानातील फक्त दोन रूपये या कामगाराला मिळतात, त्यात त्याने त्याचे कुटुंब चालवायचे· व्यापाऱ्यांनी हवेल्या बांधायच्या, गाडया उडवायच्या; वेश्येच्या मिळकतीमधील निम्मा वाटा 'घरवाली' चा, तमासगीर स्त्रीची मिळकत आणि शरीर थिएटर मालकाला, हळद, यंत्रमाग, थिएटर कामगार रोगांना बळी पडतो, अपुऱ्या मजुरीने, गरीब अधिक गरीब होतो आहे· दोन वेळेचे जेवण कुटुंबाला पुरवता येत नसल्याची खंत, उद्याची विंवचना त्याला दारू, बाई, मटका, हाणामाऱ्या अशा व्यसनांच्या आधिन करते· व्यसनांना, रोगांना, कौटुंबिक ओढाताणीला बळी पडणारा हा कामगार म्हणजे विषम समाजरचनेतील उच्चभ्रूंकडून घेतलेला लोकशाहीतील, विज्ञानयुगातील बळी आहे·

हळद आणि यंत्रमाग, सिनेमा थिएटर कामगार हे हळद, वस्त्र, मनोरंजन यांच्याशी संबंधित घटक आहेत· समाज मांगल्य, अंगावर कपडा नि साहित्य कलेचा पुरस्कार ही अभिजात जीवनाची कल्पना करून मानवीमूल्यांची जोपासना करतो, त्यासमाजातील हे उघडेनागडे, ओरबडले गेलेले, दुबळे कमजोर कामगार आहेत· अभिजात जीवनाचा, मानवीमूल्यांचा स्पर्शच त्यांना होऊ दिलेला नाही· हे समाजजीवनाचे चित्र आहे· हळद विकणारा शेतकरी, गुदामात, पेवात काम करणारा दुष्काळातून आलेला कामगार, हमाल आणि यांच्यावर अवलंबून असलेले खेडयातील घर हे सारेच शोषणाच्या दुष्ट वर्तुळातील आहेत· लज्जारक्षणासाठी निर्माण होणारे वस्त्र, वस्त्रोद्योग, वस्त्र निर्माण करणाऱ्या कामगाराला जीवन जगताना निर्लज्ज बनवतो, रात्रपाळीला जाणारी पत्नी बाहेरख्याली झाली, वहीफर्णामुळे त्याची मुले उनाड झाली तरी तो सहन करतो· 'हळद' मांगल्य सुचविणारी, बनवणाऱ्या कामगाराला कधी स्पर्श करीत नाही, देवाचा भंडारा त्याला 'पावत' नाही. उलट, तो छातीत जाऊन हा रोगाला बळी पडतो· पण व्यापारी प्रवृत्तीत मानवतेचा गहिराभाव निर्माण होत नाही याचे दुःख लेखकाला आहे·

वेश्यांच्या जीवनाविषयी मध्यमवर्गीयाला भीती, कुतूहल असते, पिवळ्या साहित्याने ते अधिक चाळवते. वेश्यांच्यामध्येही स्तर आहेत. कामाठीपुऱ्यातील ग्रामीण, गांवढळ, आंध्र, केरळ, मंगलोरी, सुशिक्षित, मद्रासमधील भस्म लावणारी तर टूपिस स्कर्टमधील नेपाळी, हॉटेलवर जाणारी कॉलगर्ल आणि इझीमनीसाठी व्यवसाय करणारी 'स्टेनो-टायपिस्ट' अशा विविध प्रकारच्या वेश्या, त्यांची विविध प्रकारची गिऱ्हाईके, त्यांचे विविध प्रकारे शोषण करणारे मालक, घरवाली, आदमी, बहारवाला, हिजडा, झुलवा अशी विचित्र आणि वैषम्य वाटावी अशी समाजजीवनाची स्थिती पाहिल्यानंतर संवेदनशील माणसाच्या मनात करूणा निर्माण होते. देवदासी, वेश्या यांचे जीवन म्हणजे समाजातील आदराचे स्थान असलेल्या भारतीय संस्कृतीचे प्रतीक असणाऱ्या "स्त्री"ची त्याच समाजाने केलेली तिच्या जीवनाची पराकोटीची विटंबना माणूसपणाची लाज निर्माण करते. ही विटंबना पुणे-मुंबई ते निपाणी-गडहिंग्लजपर्यंत सारख्याच पध्दतीची आहे.

समाजाकडून प्रचंड विटंबना होऊनही स्त्री त्या वस्तीत रहाणाऱ्या किंवा लेखकासारख्या माणसाला भाऊ समजते, मायेचा बहर येऊन बहिणीच्या नात्याने शरीरविक्रीतला "एक रूपाया" हातावर ठेवते तेव्हा लेखकाबरोबरच मानवी मन निःशब्द होते. तिचेही मन समाजातील इतर स्त्रियांसारखे. प्रेमाला, माणुसकीला, नात्यागोत्यासाठी आसुसलेले दिसते. पूजा, उपवास, नवस करणारी, गणपती, देव यांची वर्गणी श्रध्देने देणारी "शिकावं" असे वाटणारी, पोरांसाठी, संसारासाठी आसुसलेली आणि रात्र झाली की पोटासाठी दिवाळी करणारी, अंधारात श्वापदांसारखी गिऱ्हाईके शोधणारी ही स्त्री म्हणजे या समाजातील शोषण करणाऱ्यांची भांडवल आहे.

धंद्यातील स्पर्धा, संघर्ष यामध्ये टिकण्यासाठी फॅशनची जरूरी आहे, त्यामधून हिंदी सिनेमाची हौस असलेला हा समूह त्या बेगडी जीवनाशी एकरूप होऊन जातो, तसा जगू पहातो. अज्ञानामुळे आपल्या तोंडाला लावलेल्या पावडर इतकाच तो सिनेमाही नकली आहे हे यांच्या लक्षात येत नाही. अशावेळी एखादी जुनी घरवाली वेश्या म्हणते, "आमच्या वेळी असं नवंत, आम्ही जीव लावायच गिऱ्हाईकाला. आता म्हणजे नुसती फ्याशन." [७] असे दोन पिढीतील धंद्याबद्दलचे अंतर जाणवते. पण हे जिणे नको असा नकार येत नाही, कारण, या व्यवसायात आल्यानंतर ती बाहेर पडूच शकत नाही, इतकी विचित्र समाजाची मनोधारणा या धंद्याविषयी असते. एखाद्याने संसार करण्यासाठी नेले

तरी समाजात या स्त्रियांची हेटाळणी होते· खूपवेळा तिला लागलेल्या सवयी, धंद्याची, कापडांची, फॅशनची, सिनेमा, हॉटेलचे खाणे या ऐषआरामाची गोडी संसारात रस घेऊ देत नाही·

वेश्यांच्या पावडर फासण्यापासून कपडयापर्यंत दारापासून खोल्यापर्यंत उथळ, भडक रंग जो त्यांच्या आयुष्याचे बेरंग दर्शवितो, एवढेच नव्हे तर इथले निरोधही बेरंगी व प्रदर्शनीय· यांचे जगणे वागणे ही गि-हाईकाच्या आवडीनिवडीप्रमाणे· त्या जगत असतात घरवालीच्या कर्जाखाली, निम्मे पैसे, लाईट, पाणी बिल तिला द्यावे लागते· धंद्यासाठी स्वतःचे बेडशीट वापरावे लागते· मळकट, वीर्याच्या वासाने भरलेल्या खोल्या गि-हाईकाचा रोग व व्यसन यामुळे तरूण वयात मरणासन्न जीवन जगणा-या या वेश्यांची खरी शोषणकर्ती "घरवाली आई", एक स्त्रीच आहे· इथले दलाल भारतभर फिरत असतात, गुंड, राजकीय पुढारी, पक्ष, पोलीस यंत्रणा यांचे हप्ते ही स्त्री स्वतःला विकून देते· बागाईतदारांच्या पोरांना तिला वेगळी ट्रीटमेंट द्यावी लागते· समाजाच्या दृष्टीने वेश्या म्हणजे दुकानातली वस्तू· तिला गि-हाईक नाकारता येत नाही· प्रचंड इच्छा मारून शरीर विक्रय तिला करावा लागावा ही अगतिकता समाजजीवनाची आहे· या वेश्यांच्या वस्त्या म्हणजे सेक्स मेलेले मन, भविष्य नसलेले डोळे घेऊन गि-हाईक शोधणारी पांढ-या कातडीच्या जनावरांची वस्ती आहे· समाजजीवनाच्या या दर्शनाने माणूसपणाचीच शिसारी यावी असे हे दर्शन अवचट वाचकाला घडवतात·

समाजातील वेश्यांचे प्रमाणही प्रचंड आहे, मुंबईतील एका कामाठीपु-यात सात-आठ हजार वेश्या आहेत, फॉकलंड रोडला चार हजार, ग्रँट रोडला हजार, यांचे दर दोनपासून वीसपर्यंत तर काही ठिकाणी पाचपासून पाच हजारापर्यंत, मुंबईपासून केरळ पर्यंतच्या व मुंबईपासून नेपाळपर्यंतच्या मुली या व्यवसायात आणल्या जातात व संपूर्ण आशिया खंडात पोहोचवल्या जातात·

अनिल अवचट मंडईतील बाजारभावासारखे ही आकडेवारी जेव्हा सांगू लागतात· तेव्हा वाचकांच्या मनावर प्रचंड दडपण येते· समाजजीवनातील अंधारातला हा हिमनग पाहून वाचक अवाक नि अस्वस्थ होतो·

वेश्या ही समाजाची गरज आहे· प्राचीन काळापासून हा व्यवसाय चालू आहे हे दुष्ट समर्थन शोषणवाल्यांचेच आहे· ख-या समस्येकडून लक्ष विचलित करणे,

दुसरीकडे वळविणे हा त्यामागील उद्देश आहे. यासाठी यांना टक्कर देऊन, समस्येचा मुळापासून बिमोड करण्याचा वसा नवतरूणांनी घेतला पाहिजे हा आग्रह अवचटांचा आहे, पण लंच अवर मध्ये इझीमनीसाठी शरीरविक्रीचा धंदा करणारी सुशिक्षित स्त्री जेव्हा आढळते तेव्हा वेगळ्या पध्दतीने समाजमन, जीवन तपासणे गरजेचे आहे याचे भान हे समाजमनाचे चित्र प्रतिबिंबित करताना अवचटांना आहे.

अज्ञान, अंधश्रध्दा, दारिद्र आणि अस्पृश्यता, देवदासी, हुंडा प्रथा, दुष्काळ आणि दलाल यांच्याकडून फसविलेल्या या स्त्रियांच्या वस्त्या म्हणजे समाजजीवनातील अतृप्त आत्म्यांचे गोठवलेले जग होय. या जगात धंदा करणाऱ्या बहिणीकडे रहायला आलेल्या भावाला गिऱ्हाईकाचाच दर द्यावा लागतो. समाजजीवनातील, स्त्री-पुरूष संबंधाचा इथे सारा चिखल होतो.

"पैंजण नव्हे बेडया" मधील तमासगीर स्त्रियांच्या नृत्याची कला "फोक"ची चर्चा करणाऱ्यांसाठी आहे, बुद्धिवंताना लोकधारेचा शोध घेण्यासाठी आहे, पण लोकजीवनाचा शोध मात्र ते हेतुपूर्वक टाळतात. स्वतःच्या प्रगतीपलीकडे जाऊन त्या लोकसमूहाचे काही वेगळे जग आहे, समस्या आहेत याची दखल हे बुद्धिमान घेत नाहीत. हा कलावंताचा वसा आहे व वेश्या समाजाची गरज आहे असे निलाजरे समर्थन ही पांढरपेशी मंडळी करीत असतात, पोटासाठी रंग फासलेल्या, पायात पैंजण बांधलेल्या या कलावंत स्त्रिया थिएटर मालक, दलाल, बागाईतदार, पोलीस, शासन यांची सावज बनतात. थिएटर मालकाची मनधरणी करून खेळ लावावा, गावात पाटील, पुढारी, शासनाचे अधिकारी यांना एखादी मुलगी वापरायला देऊन फड उभा करावा, एक-एक रूपायासाठी शरीरस्पर्शासाठी, अवयवांच्या दर्शनासाठी तिच्या भिजणाऱ्या चोळीसाठी चाललेली विकृत स्पर्धा समाजजीवनाच्या हीन अभिरूचीचे दर्शन घडवते. रसिक हा रसिक न रहाता पैशाच्या बळावर या स्त्रियांचे शोषण करणाऱ्या जळू सारखा वाटतो.

आज तमाशाकलेतील सहजता, उत्स्फूर्तता, मोकळेपणा कधीच हरवला आहे. उरली आहे ती सिनेमाची भडक नक्कल, "स्त्री"त्वाची अब्रू कलेच्या दारावर टांगूनच करावा लागणारा खेळ ही समाजजीवनातील स्त्रीजीवनाची अगतीकता आहे.

कोल्हाटी जातीने परंपरागत व्यवसाय म्हणून हा व्यवसाय स्वीकारला आहे. कधी वृद्ध आई, कुटुंबासाठी त्यात या मुली गुंततात. यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी

"मराठी तमाशा परिषद"निर्माण केली पण लोकशाही प्रक्रिया आणि गरीब मतदार यांच्यामुळे ती थिएटर मालकांच्याच ताब्यात गेली, त्यामुळे त्यांना मीटिंग प्रवासभत्ता मिळू लागला, चांगल्या स्त्रिया ते पुढा-यांना पुरवतात, कुंपणानेच शेत खाल्ले तर करायचे काय ? अशी कोंडी तमासगीरांची झाली आहे तर पायातील कलावंताचे पैंजण बेडया होऊन अधिकाधिक शोषण घट्ट होत आहे याचे दर्शन या लेखात घडते·

समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा यांचे फल म्हणजे देवदासी, "देवदासी" समाजापुढील एक मोठा प्रश्न आहे· या प्रश्नामध्ये खूप सनातन प्रथा आहे, ग्रामीण भागात, अस्पृश्य समाजात ती प्रथा परंपरा म्हणून स्वीकारली आहे· यल्लमा देवी, तिचा कोप याविषयीची भीती तिच्या मनात फार खोलवर रूजली आहे· तिच्या मनातील दास्य हटत नाही, तोपर्यंत पुजारी, पुढारी, पोलीस, दलाल हे देवाच्या नावावर तिला लुबाडत रहाणार· झुलवा लावून रखेली बनवणार, तर "झुलवा"मोडून धंद्याला बसवणारे आईबाप, भाऊ हे समाजघटक इथे आहेत· त्यामुळे देवदासी पुणे-मुंबई, दिल्ली, कलकत्ता अशी सा-या भारतभर वेश्या म्हणून पोहोचलेली दिसते· देवदासी म्हणजे एका अर्थाने वेश्या व्यवसायाचो फीडिंग एरियाआहे असे म्हणावेसे वाटते·

लज्जा रक्षणापुरत्या लिंबाच्या डहाळ्या बांधून संपूर्ण अंग उघडे टाकून डोकीवर देवीचा जग घेऊन डोंगर चढणा-या या देवदासी डोंगरावर सवर्ण तिला बरोबरीची वागणूक देतात एवढया गोष्टीवर ती समाधान पावते आणि ही प्रथा चालू ठेवते. अंगात येणे, जोगवा मागणे हे हिचे काम. ब्राम्हणसमाज या देवीची फक्त उपासना करतो· याचाच अर्थ अज्ञान, अंधश्रध्दा ही खालच्या समाजात खूप आहे· देवदासी प्रथा निर्मूलन परिषदेला साक्षरतेचे कार्य करावे लागते, देवीविषयी मनातील भय काढून टाकून, घृणास्पद जीवनातून बाहेर काढण्यासाठीचा हा एक प्रयत्न. अधःपतित जीवन जगणारा हा मानवसमूह कर्नाटक, महाराष्ट्र सीमाभाग , विजापूर, बेळगाव, निपाणी, गडहिंग्लज या प्रदेशातील महार कुटुंबातून फार मोठया प्रमाणात दिसतो· देवदासी एका बाजूला वेश्येचे जनावराचे जिणे जगते, त्याबरोबर जटा वाढल्याने पू-जखम घेऊन उघडया-नागडया अंगानी अंगात येऊन नाचते· हा सारा प्रकार आजच्या लोकशाही विज्ञानयुगात माणूसपणाला हीनत्व आणणारा आहे·

सिनेमा थिएटर कामगार शापित जीवन जगताना दिसतो· झगमगत्या फिल्म इंडस्ट्रिजमधील हा अगदी तळातला कामगार, वैयक्तिक जीवनात प्रकाश शोधताना दिसतो· बारा-चौदा तास काम, अगदी थोडी मजुरी, मित्र नाहीत की नातेवाईक नाहीत· संसार सुरू करावा तर या असल्या डयूटीमुळे बायको सोडून जाते· असा हा भणंग कामगार, त्यामुळे तो सारा वेळ थिएटरच्या आवारात काढतो. बाई, बाटली, काळाबाजार, मारामारी यामध्ये बुडून जातो· त्यात संख्येने खूप कमी, त्यामुळे दुर्लक्षित· मालकांच्या दडपणापुढे संघटित होऊ शकत नाही· त्यामुळे हाही हमालासारखाच शोषणाचा बळी आहे· थिएटर कामगाराचे हे करपलेले जीवन पाहून लेखकाबरोबर वाचकही हळहळतो·

"जर्द पिवळया जगात" दिवस रात्र राबणाऱ्या शरीराचे हळकुंड झालेल्या "हळद कामगाराचे" दर्शन घडते· हळद बनवण्याच्या शेडला यांत्रिकीकरणाचा स्पर्श नाही, कामगाराच्या कष्टाची, जीवाच्या धोक्याची सांगलीतल्या व्यापा-याला चिंता नाही, पेवाच्या मालकाला "माणूस" मरण्याची काळजी नाही· गूळ हमाल काय, नि हळद कामगार काय, पाठीचे घट्टे सारखेच, इथेही पाण्याची, संडास-मुतारीची सोय नाही· "भरपाई" हा शब्द नाही म्हणजे समाजजीवनातील शोषणकर्ते सगळीकडे सारखेच· त्यांच्या दृष्टीने कामगार म्हणजे राबणारे जनावर, हमालाला हळदीचा ठसका लागला, छातीत पाणी झाले, गुडघ्यातले रक्त गेले, नजर कमी झाली, पेवात जीव गुदमरला तरी नवीन यंत्राची हवा, मानवीमूल्यांचा स्पर्श हे प्रस्थापित व्यापारी कामगारापर्यंत पोहचू देणार नाहीत, हे मात्र याच कामगाराच्या जीवावर क्लबमध्ये बिअर ढोसतात· व्हिडीओवर ब्ल्यू फिल्म पाहणारे हे व्यापारी मनुष्यबळाचे शोषण करून समाजाचे नुकसान करतात, सामाजिकतेचे भान असणा-या तरूण वर्गाला या मनुष्यबळाकडे "माणूस" म्हणून पाहण्याचे आवाहन अवचट करतात·

"धागे आडवे उभे" मधील यंत्रमाग कामगाराचे खडतर आयुष्यही हळद कामगारासारखेच आहे· यांचे घरदार इचलकरंजीत विविध ठिकाणी राबताना दिसते· दोन-दोन पाळ्या सलग काम करूनही दारिद्र यांची पाठ सोडत नाही· या दारिद्र्यात कष्टाने जगत असताना आयुष्याचे काटेरी वस्त्र कधी झोपडपट्टी झाले नि झोपडपट्टीतील घर कधी वेश्यावस्ती झाली हे त्याला नि समाजालाही समजलेले नाही, पण इचलकरंजीची

झोपडपट्टी होते आहे याची जाणीव वाचकाला होते. प्रस्थापित व्यापाऱ्यांना याचे भान कोणी आणून द्यायचे हा प्रश्न आहे. वेश्या, देवदासी, तमासगीर स्त्री यांना मरणासन्न अवस्थेत, रोगजर्जर होऊन रस्त्यावर भीक मागावी लागते. आईबाप, भाऊ कोणीही जवळ करत नाही असे हे दुष्ट यातनायंत्र समाजजीवनात अशुध्दता निर्माण करते. सुजाण तरुणांनी हे यातनायंत्र थांबवण्याचे आवाहन स्वीकारले पाहिजे आणि "माणूस" विकण्याचे हे प्रकार थांबले पाहिजेत. एक चांगले, निर्भर समाजजीवन जगता येण्यासाठी सर्वांसह प्रगती हे तत्त्व स्वीकारले पाहिजे असा आत्मविश्वासपूर्ण विचार मांडून अवचट समाजमनाला उभारी आणणारे विचार सांगतात.

## स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचा ध्यास :-

लोकशाही मानणारा हा लेखक जीवनाचा प्रवास संपूर्ण समाजाबरोबर झाला पाहिजे असेही मानतो. प्रत्येकाचे स्वातंत्र्य, जगण्याचा हक्क शाबीत राहिले पाहिजे. जगण्याच्या उर्मीला समता आणि विश्वबंधुत्वाचे व्यापक क्षेत्र लाभले पाहिजे. सामान्यातल्या सामान्य माणसाला मग तो थिएटर कामगार असो किंवा हळद, यंत्रमाग कामगार असो किंवा सृजनशीलतेचे प्रतीक असणारी स्त्री असो यांची चांगले आयुष्य जगण्याची उर्मीच जर प्रचलित व्यवस्थेतून नष्ट होत असेल तर ती व्यवस्था, यंत्रणा, माणसानेच निर्माण केली आहे, माणूसच ती बदलू शकतो, अन्यथा परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडून माणूसपण संपून जाईल. याची भीती अवचटांना वाटते.

वेश्यांच्या जीवनात स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांऐवजी करूण रसाचाच परिपोष झालेला दिसतो. परावलंबी जीवन, पराकोटीची विटंबना सहन करणारी ही वेश्या या समाजातील स्त्री आहे, हेच समाज नाकारतो. या स्त्रीलाही भाव-भावना असतील, आयुष्याची स्वप्ने असतील हे नाकारून समाजपुरूष त्या स्त्रीला एक भोगलालसा भागवणारे यंत्र समजतो. वेश्या ही समाजाच्या गरजेचा एक भाग आहे अशी समाजपुरूषाची कल्पना आहे, भोंगळ समर्थन आहे. "हा वेश्या व्यवसाय संस्कृतीच्या प्राचीन काळापासून आहे. तो आजवर कुणी टाळू शकलेलं नाही. संपन्न देशातही तो आहे. त्यामुळे तो मानवी संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे हे मानलं पाहिजे." हा विचार म्हणजे विकृत मनाला समाज रचनेतून मिळालेला पाठिंबा आहे. लेखकाला हे हीन विचार मानवतेच्या पातळीवर मान्य होणारे नाहीत. सुसंस्कृत जगात स्त्री 'माणूस' च असायला हवी. स्वातंत्र्य,

समता या जीवनमूल्यांच्या स्पर्शाने निश्चितच तिच्या जगण्यातील आनंद वाढलेला असेल. यासाठी स्त्रियांच्या विशेषतः अज्ञान, अंधश्रध्देतून निर्माण होणा-या समस्याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे, अग्रक्रमाने त्या सोडविण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. "घरवाली" ते "पिवळे साहित्य" निर्माण करणाऱ्यापर्यंतचे तिचे "स्त्री" म्हणून जे शोषण होते ते थांबले पाहिजे. तिची वेठबिगारी नष्ट झाली पाहिजे. तिला शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे म्हणजे तिच्या उध्दाराचा मार्ग तिला सापडेल.

कलावंत असून "पैंजण नव्हे बेडया" या लेखामधील तमासगीर स्त्री शरीर विक्रय करते, शोषणकर्त्यांना बळी जाते, सारा समाजपुरूष या स्त्रीला भोगवस्तूच म्हणून पाहतो, तर थिएटर मालक साधन म्हणून या स्त्रियांचे स्त्रीत्व हिरावून घेतो. प्रेक्षक खूप हीन अभिरूचीचा आहे तर श्रीमंत मस्तीने वागतात. एकंदर, या स्त्रीच्या जीवनात जीवनमूल्यांचा पत्ता नाही. "मराठी तमाशा परिषदे"कडून या वंचित समूहासाठी आजपर्यंत तरी भरघोस कार्य झालेले नाही. थिएटर कमी व फड, पाटर्या खूप त्यामुळे त्यांच्यात स्पर्धा आहे. ती शोषणकर्त्याला हातभार लावते. या थिएटर मालकांच्या बंधनातून रोशन सातारकर सारखी प्रसिध्द कलावंतही डॉक्टरी उपायासाठी बाहेर पडू शकत नाही. कमालीची परस्वाधीनता, गुलामगिरी, थिएटरच्या खुराडयातल्या तमासगीरांच्या संसारात स्वातंत्र्य, समतेचे वारे कधी फिरत नाही.

या कलावंतांसाठी सुरक्षित अशी थिएटरे शासनाने महाराष्ट्रभर बांधावीत. मालक, ठेकेदार यांची मक्तेदारी संपवून कलावंतांचे स्वातंत्र्य, सुरक्षितता अबाधित करावी म्हणजे मुक्तपणे संचार करणारे हे कलावंत माणुसकीचे, समतेचे, बंधुत्वाचे संदेश माणसांच्या मनापर्यंत सहज पोहोचवतील. या जीवनमूल्यांना जोपासण्यासाठी "मराठी तमाशा परिषदे"ने प्रामाणिकपणे काम केले पाहिजे व ते करतील, येणाऱ्या उद्यासाठी लोकशाही प्रक्रियेत त्यांना ते करावे लागेल हा आशावाद लेखक व्यक्त करतो.

ग्रामीण भागात या कलावंतांना उपरे जीवन जगावे लागते, त्यासाठी "फड" उभे करतानाचे जाचक नियम काढून टाकले पाहिजेत. तमासगीराच्या स्त्रीच्या पोटी जन्माला येणाऱ्या मुलांना या व्यवसायातून बाहेर पडता आले पाहिजे, त्यासाठी त्यांच्या शिक्षणाची सोय झाली पाहिजे. "वॉल हँगिंग"पुरती लोक कलेची चर्चा करणाऱ्यांनी लोक कलाकारांच्या लोकजीवनाचे वास्तव पाहिले पाहिजे. कलेमागचा त्यांची मने, परिस्थिती

यांचा विचार आपण सर्वांनी बंधुत्वाच्या भूमिकेतून केला पाहिजे हा अवचटांचा आग्रह आहे·

"देवाची माणसं" मधील देवदासी स्त्रीचे जीवन म्हणजे मानवीमूल्यांना काळिमा फासणारे जीवन आहे· समाजातील एका भयंकर प्रचलित रूढीतून, देवाच्या नावाने बहुजन, अस्पृश्य समाजाने स्वीकारलेली ही गुलामगिरी आहे· अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे या स्त्रीने स्वातंत्र्य, समता आदी जीवनमूल्यांची कवाडे स्वतःच बंद केली आहेत· चारचौघींसारख संसारी आयुष्य जगू पाहणारी ही स्त्री देवीच्या भीतीपोटी "देवदासीत्व" स्वीकारून मानसिक गुलामगिरीत गुंतली आहे, हे मानसिक दास्य दूर होणे आज लोकशाही विज्ञानयुगात सुध्दा अवघड बनते आहे याचे भान लेखकाला आहे·

हा प्रवाह रोखण्यासाठी जातीयवाद, अस्पृश्यता निवारण झाले पाहिजे, सर्वजण समान आहोत हे बंधुत्व स्वीकारले पाहिजे· अज्ञान, अंधश्रध्दा दूर होण्यासाठी या तळातल्या समाजापर्यंत शिक्षण पोहोचवलं पाहिजे, की ज्रेणे करून त्यांना मानसिक सामर्थ्य प्राप्त होईल· डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनी जागवलेली अस्मिता घेऊनच या गुलामगिरीच्या बेडया तोडता येतील व दुर्लक्षित मानवसमूहाला जीवनमूल्यांचा स्पर्श करता येईल, गडहिंग्लज, निपाणी येथील महात्मा फुले प्रतिष्ठानचे कार्यकर्ते "देवदासी शिबिर", "जटा निर्मूलन" कार्यक्रम घेऊन करत आहेत· त्यामुळे देवदासी "स्त्री"ला भान आले आहे· ती बोलू लागली आहे, आपल्याच वाटयाला हे का, असा प्रश्न ती स्वतःला विचारू लागली आहे· मानवी मूल्यांच्या स्पर्शाने सुरू झालेले हे आत्मपरीक्षण तिचे मनाचे दास्य दूर करेल हे त्या शिबिरात विद्रोही नकार बोलणा-या गौराबाई सलवाघेंसारख्या स्त्रिया पाहतांना वाचकाला अनिल अवचटांचा "माणसां"वर असलेला विश्वास मनोमन पटून जातो·

शेजारच्या कर्नाटकात परिवर्तनाचा विचार म्हणावा तसा पोहोचलेला नाही· याची खंत अवचटांना आहे· यावरून त्यांची लेखणी समाजमनाचा कसा चौफेर शोध घेते ते स्पष्ट होते·

"धागे आडवे उभे" मधील कांडीमशीनवरील स्त्री रात्रपाळीचे काम करते, हे कायद्याच्या विरूध्द तर आहेच, पण मानवीजीवनमूल्यांच्याही विरोधी आहे· मानवतेला शोभणारे नाही, एक साधी सरळ, संसार करणारी गृहिणी या रात्रपाळीच्या कामाने,

माणूसकीहीन परिस्थितीने वेश्या बनते हे समाजाचे अधःपतन आहे· सृजनशीलतेचे कुरूप रूप आहे·

हळद, यंत्रमाग, थिएटर कामगार हे कामाच्या आनंदापासून फार दूर आहेत· कामगार म्हणजे मालक, व्यापारी यांच्या दृष्टीने जनावरच· मानवी जीवनमूल्यांचा स्पर्श या कामगाराला होणार नाही अशीच यंत्रणा उभी केली गेली आहे· संघटनात्मक पातळीवर या शोषणाविरूध्द लढा दिला पाहिजे· पण थिएटर कामगार संख्येने कमी, यंत्रमाग कामगार काम अंगावर घेतो, त्याचे एकापेक्षा अधिक वेगवेगळे मालक· नक्की झगडायचे कुणाबरोबर हा त्यांच्यापुढचा प्रश्न, असा हा पोटासाठी झगडणारा कामगार संघटनात्मक पातळीवर लवकर येत नाही· एकदोन मागवाला छोटा मालक आणि कामगार यांच्यात फार मोठा फरक नाही· अशी विचित्र कोंडी या व्यवसायात झाली आहे· त्यामुळे इथे जीवनमूल्येदेखील कोंडीत असल्यासारखी दिसतात·

हळद कामगार दुष्काळी जत, कवठेमहांकाळ प्रदेशातून आलेला, येत रहाणारा आहे हे सांगलीच्या व्यापाऱ्यांना माहीत आहे त्यामुळे त्याच्या जीवनाचा विचार करावा, त्याला सोयी-सुविधा पुरवाव्यात, असे त्याला वाटत नाही, फक्त तो स्वतःच्या "मार्जिन"वर लक्ष ठेवून असतो· असा हा पेवात काम करताना गुदमरणारा कामगार कधी फुलतच नाही·

साऱ्या शोषितांच्या व्यथा आणि वेदना शब्दबध्द करताना लोकशाही मानणाऱ्या, सुजाण नागरिकांना आपण सारी "माणसं" आहोत, समाजजीवनाचा प्रवास सर्वांसह करायचा आहे हे लक्षात घेऊन वंचित मानवसमूहाला आपले म्हणून त्यांचे शोषण थांबवले पाहिजे, ही आपली जबाबदारी आहे म्हणून स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही जीवनमूल्ये घेऊन अंतःकरणापासून झाकलेले कान आणि कातडे ओढलेले डोळे उघडलेच पाहिजेत हा अवचटांचा आग्रह आहे· कारण "अत्याचारग्रस्त जीवन, मानवसमूहावर लिहिण्याची त्यांची प्रेरणा मूलतः नैतिक स्वरूपाची आहे· शिवाय या लेखनात सतत एक अपराध भावना (गिल्ट) आहे· मानव जातीत असे अनेक समूह आहेत की, ज्यांना खूप दुःखे सोसावी लागत आहेत· ती दुःखे कमी कशी करता येतील आणि या मानव-समूहांची प्रगती कशी होईल याचा त्यांना ध्यास लागला आहे·"[१] हे "धागे आडवे उभे" वाचताना वाचकाला जाणवते·

**माणूसपण कोमेजून टाकणारी व्यवस्था :-**

समाजात जगत असताना प्रत्येक माणसाला फुलता आले पाहिजे, माणसातील माणूसपणा फुलण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मानवीमूल्यांचा आग्रह धरणा-या ज्ञानदेवापासून जगातील सर्व विचारवंतानी विश्वबंधुत्वाचे, लोककल्याणाचे, चांगल्या जीवनाचेच पसायदान मागितले आहे· त्या परंपरेचा वसा घेऊन अनिल अवचट "माणूसपण" कोमेजून टाकणारी ही व्यवस्था बदलली पाहिजे नि ती माणसांकडून बदलता येईल हा आत्मविश्वास व्यक्त करतात·

यातनायंत्रात सापडलेले, समाजपरिघाबाहेर असलेले उपरे, दुर्लक्षित, अस्थिर आणि असुरक्षित मानवसमूह अवचट जाणीवपूर्वक वाचकांसमोर आणतात· प्रचलित व्यवस्था ही उच्चभ्रू, श्रीमंत व्यापारी, मालक अशा शोषण करणा-या वर्गाच्या हातात आहे· दुस-या बाजूला अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज या प्रचलित प्रथा या समूहांचे शोषण करताहेत· माणूसपण नाकारणारी ही व्यवस्था बदलताना प्रस्थापिताशी, अज्ञान अंधश्रध्देशी, मानसिक दास्याशी टक्कर आहे· याचे लेखकाला भान आहे· सुजाण तरूण वर्गापुढे ही मानवतेची विटंबना लेखक ठेवतो व त्यांना मानव्याची हाक देतो, याच वेळी अवचटांची वैचारिक संघर्षावर, मानवी मूल्यांच्यावर श्रध्दा आहे, कारण त्यांना जाणीव आहे ही मानवीमूल्ये माणसाला व्यापक बनवतात· धर्म, जात किंबहुना देश या पलिकडे पहायला लावून "माणूस" म्हणून एक चांगले आयुष्य, अभिमानी जीवन जगता येईल असा त्यांना आत्मविश्वास आहे·

"वस्त्या वेश्यांच्या" मधील अज्ञानी पोटासाठी शरीर विक्रय करणा-या या स्त्रिया आणि त्यांचे शारीरिक, आर्थिक, मानसिक शोषण करणारे समाजातील घटक पाहिले म्हणजे ही स्त्रीजीवनाची विटंबना माणूसपण कोमेजून टाकणारी आहे हे लक्षात येते· घरवालीपासून हॉटेल बॉय, बहारवाला पर्यंत, श्रीमंतापासून तिच्या "भावा"पर्यत सारेच शोषण करणारे आणि त्या स्त्रीचे तारूण्य संपले, रोगांनी पछाडली की ही स्त्री रस्त्यावर येते, बेवारशी ठरते, तिच्या अंत्यसंस्कारालाही कोणी वर्गणी देत नाही, महानगर-पालिकेला बेवारशी प्रेत म्हणूनच विल्हेवाट लावावी लागते, मध्यमवर्गियांना वेश्यांच्याविषयी असणारी भीती, कुतूहल, उथळ साहित्यातून तिचे रंगवलेले चित्र म्हणजे माणूसपण कोमेजून टाकणा-या व्यवस्थेला पूरक असेच शोषण आहे·

या वस्त्या म्हणजे शरीर विकून जगण्याचा चाललेला प्रचंड संघर्ष, प्राचीन काळापासून चालत आलेली परंपरा, गरज हे खोटे समज माणसाच्या मनात घर करून बसले आहेत, त्यामुळेच वेश्यांचे प्रवाही स्वरूप समाजात पूर्वीपासून वाहताना दिसते. "माडी चढणे" हे अध:पतनाचे काम आहे हा सामान्य माणसांच्या मनावरचा परिणाम जाणवतो. पण जेव्हा हे वास्तव जीवन पाहतो तेव्हा करूणाच दाटून येते. वेश्येची माडी चढताना जिन्यातील आधारासाठी बांधलेली दोरी जितकी गुळगुळीत आणि काळी तितकीच वेश्या जीवनाची समस्या जुनी नि काळी आहे.

वेश्येला घरवालीला निम्मे पैसे द्यावे लागतात, घरवाली मारवाडयाला हप्ता देते, घरभाडे देते, पोलीसांना हप्ते देते, दलालांना दलाली देते आणि हे सारे पैसे ती या मुलींच्याकडून वसूल करते. या मुली कुणाकडून वसूल करू शकत नाहीत, त्या शरीर विकून तिला पैसे देतात म्हणजे माणूसपण कोमेजून टाकणारे एक दुष्ट वर्तुळ कसे समाजात वावरत असते याचे प्रत्यंतर येते. या शोषणात आदमी, बहारवाला, फेरीवाले प्रत्येकजण तिला फसवत असतात तर ऐतखाऊ भाऊ मारहाण करून हिच्याकडून पैसे नेतो, "गि-हाईकापुढं स्वत:चं वस्त्र फेडणारी ही बाई एरवीही सगळीकडनं नागवली गेलेली असते."[१०] असे हे माणूसपण उघडे-नागडे करणारी व्यवस्था मनाला शरम वाटायला लावणारी आहे.

गणपती, दिवाळी सण हे "वेश्यांचे सिझन" एक एक वेश्या वीस वीस गि-हाईक करते. प्रश्न असा सणांमधील परमेश्वरांविषयीचा भक्तिभाव खरा की वासना भागवण्यासाठी वेश्येकडे जाण्याचा मनाचा विकृत आनंद खरा ? हे निरोगी समाजमनाचे चित्र का ? वेश्यांचे "सीझन" म्हणजे एखाद्या साखर कारखान्याचा सीझन ! एखादा "गेस्ट" स्टेशनवर "रिसिव्ह" करावा तसे ती हॉटेलवर जाऊन गि-हाईक रिसिव्ह करते. अरबांच्या पैशाला बळी पडते. गरिबीमुळे नेपाळी स्त्री मुंबईत येते, ती जास्त पैसे मिळवून देते, इतके "एक बाई इकडे असली तरी ती तिकडचा संसार चालवू शकते. त्यामुळे इथे या मुलीचे आई-वडीलच येऊन तिची विक्री करतात. भाऊ बहिणीला आणून घालतो, एवढंच काय नवराही बायकोला आणून विकतो."[११] नाते, पावित्र्य, मांगल्य या जीवनमूल्यांचा चिखल होतो, अशी ही विकृत आजारी मनाची समाजरचना माणूसपण कोमेजून टाकणारी आहे.

तमासगीर "स्त्री"चे पैंजण जे कलेचे नाद निर्माण करतात तेच पैंजण बेडया बनून तिच्या जीवनाचा सूर हरवतात· आर्यभूषण थिएटरमध्ये संगीत बारी करताना किंवा गावागावात फड उभे करताना ती एक उपभोगाची वस्तू म्हणूनच समाजपुरूष तिच्याकडे पाहतो· कलावंत म्हणून तोंडाला फासलेला रंग आणि वेश्येने फासलेली पावडर, दोघींच्याही जीवनाचे सूत्र एकच व सारखेच आहे· फक्त व्यासपीठावरच्या चर्चेत "कलावंत व त्याचा वारसा" याचा गौरव होतो, तो पांढरपेशांचा शुध्द खोटारडेपणा आहे, याची चीड अवचटांना आहे·

सिनेमा थिएटर कामगाराचे जीवन कोमेजलेले जीवन आहे, त्यांच्या समस्या आहेत, असे काही शापित जीवन जगणारी दुर्लक्षित माणसे आहेत याचे आश्चर्य लेखकासह वाचकालाही वाटते· "राष्ट्रगीत" त्याच्या दृष्टीने पंधरा तासाची डयूटी संपवून झोपण्यासाठी मोकळे झालो याची खूण वाटते· कारण "माणूस" म्हणून कोणत्याच जीवनमूल्यांचा त्याला स्पर्श झाला नाही· त्याला "राष्ट्र" "राष्ट्रगीत" समजण्याचा प्रश्नच येत नाही, इतके संकुचित जीवन ही माणसे जगतात· बुद्धिमंत मध्यमवर्गीय, पोटभरल्या राष्ट्रीयत्वाच्या समानतेच्या, बंधुत्वाच्या, मानवतेच्या गप्पा मारत असतात·

"हळद"कामगार यापेक्षा वेगळा नाही· त्याच्या दुष्काळी जीवनाला सहानुभूती न दर्शवता परिस्थितीचा फायदा घेऊन व्यापारी त्याचे शोषण करतात· पेवात गुदमरणा-या कामगाराला ते माणूस मानायला तयार नाहीत· अशाच प्रवृत्तींचा बळी "यंत्रमाग कामगार" आहे· या कामगाराच्या कामाला वेळापत्रक नाही· मजुरीला अर्थ नाही, राबताना रोगाला बळी पडतो , पोर वहीफणीवर कामाला, बायको कांडीमशीनवर रात्रपाळी करताना ना इथे कायदा ना नैतिकता इथल्या व्यापा-यांनी पाळलेली आहे· असे भकास संसाराचे वस्त्र विणणारा हा कामगार जगण्याची ऊर्मीच हरवून बसला आहे·

तर दिवसरात्र राबणा-या नव-याकडून सुख मिळत नाही, संसाराला पैसा पुरत नाही, तर काही स्त्रिया मोकळा वेळ जात नाही म्हणून छुपा व्यवसाय सुरू करतात·

इचलकरंजीतील ही कांडीमशीनवरील स्त्री, निपाणीतील तंबाखू-कामगार स्त्री, सीमाभागातील "देवदासी" स्त्री, या वेश्या व्यवसायात येतात· म्हणजे हा प्रचंड टापू माणूसपण कोमेजणा-या प्रथेने, व्यवस्थेने व्यापला आहे· या प्रथा, व्यवस्था चांगल्या जीवनाची बंधने तोडून लावतात· त्यामुळे एक स्वैर संस्कृती समाजजीवनात वावरताना

दिसते. माणूसपण कोमेजून टाकणा-या या व्यवस्थेतील मानवसमूहाचे अचूक असे वर्णन करताना अवचट म्हणतात, "या प्रचंड चरकात पाच-सहा वर्षांचा मुलगा वहीफणीच्या निमित्ताने शिरतो आणि दुस-या बाजूने चाळीशी उलटलेला पिकल्का पडलेला, टी.बी.जडलेला कंबरेत वाकलेला कामगार चिपाड होऊन बाहेर पडतो. चाळीशीनंतर जगेल ते आयुष्य हाच त्याचा बोनस. या चरकातून परत फिरायला जागा नाही. पुष्ट व्हायला वाव नाही. उलट शुष्क होत, चिपाड होत जाणं हेच वाटयाला येते"[१२] हे चित्र अवचटांना अस्वस्थ करते म्हणूनच या सतत अत्याचारग्रस्त, दुर्लक्षित मानवसमूहांकडे ते सर्वांचेच लक्ष वेधतात.

## वास्तववादाचे चिंतनाभिमुख चित्रण :-

"धागे आडवे उभे" मधील लेखांच्यात अवचटांचे लेखन वैचारिक व ललित अशा दुहेरी पातळीवर जातानाच त्याला चिंतनपरतेची डूब लाभते. त्यामुळे त्यांचे विचार वास्तवरूपाची चिरंतनता घेऊन येतात. कारण ते स्वतः माणसावर प्रेम करणारे आहेत, जीवनमूल्यांची जोपासना करणारे आहेत. त्यासाठी कठोर परिश्रम स्वतः घेतात, परखड आत्मनिरीक्षण करून "स्व"ला तपासतात, दुर्लक्षितांचे जीवन स्वतःचे समजून त्यांच्या प्रश्नांचा वेध घेतात.

वास्तवाचा शोध घेताना लेखकाला वेश्यांच्या बाबतीतील समाजाची गरज आहे प्राचीन परंपरा आहे, संपन्न राष्ट्रात आहे ही समर्थने खोटी वाटतात, उलट वास्तवात "वेश्यांकडे जाणं हे व्यसन आणि काही प्रमाणात विकृती आहे, रेसचा जसा नाद, तसा बाईचा नाद"[१३] असे समीकरण अवचट या व्यवसायाविषयी केलेल्या निरीक्षण, चिंतनातून मांडतात.

कुटुंबाचा गाडा ओढण्याची स्त्रीवरची जबाबदारी आर्थिक दारिद्र्यामुळे तिची ओढाताण करते, त्यात ऐतखाऊ पुरुष, बाप-भाऊ हे तिच्या शोषणाचे अधिकचे घटक बनतात. पैसा मिळवण्याचा सोपा उपाय म्हणून मुली, बहिणी-पत्नी हे बाजारात विकतात, किंवा अज्ञान, अंधश्रध्दा, प्रथा, प्रतिष्ठा यासाठी या स्त्रियांचे बळी जातात. हुंडयाच्या प्रथेतून आंध्रीय व केरळीय स्त्री नर्स वेश्या व्यवसाय करताना दिसतात. अस्पृश्य समाजातील काम नसलेला, ऐतखाऊ बनलेला पुरुष, सोबतीला अज्ञान प्रचंड अंधश्रध्दा,

पुजाऱ्यांचा पाठींबा त्या स्त्रीला देवदासी बनवतो, तर कुटुंबासाठी रात्रपाळी करणारी इचलकरंजीतली कांडी मशीनवरील स्त्री आगतिकतेने राब राब राबून आर्थिक विवंचना संपत नाही तेव्हा वेश्या व्यवसाय सोपा मार्ग वाटून पत्करते हे वास्तव नाकारता येणार नाही·

घरवाली, मालक, दलाल ,पाटील, पोलीस, बागाईतदार, व्यापारी हे शोषण करणारे घटक सारखेच आहेत· गॅसबत्तीचे भाडे देणारी ही स्त्री आणि गुदामात स्वतःची मेणबत्ती लावून हमाली करणारा हमाल, स्वतःच्या अपु-या मजुरीतून बॅटरीचे सेल घालणारा थिएटर कामगार, सारे शोषितच· यामध्ये स्त्रीचे स्त्रीत्व अधिकच शोषले जाते· उत्तान वागणारी नरक यातना भोगणारी ही स्त्री, हातावर बहिणीच्या नात्याने रूपायाचे नाणे ठेवते तेव्हा जीवनमूल्येच उलटीसुलटी होतात· स्वतःविषयी घृणा वाटावी असे तिच्या निर्मळ प्रेमळ मनाचे वास्तववादी दर्शन घडते·

पैंजणाच्या नादात बोर्डावर शृंगाराची उधळण करणारी, रात्री उत्तान, बीभत्स शृंगार करणारी हीच स्त्री पांढरी साडी नेसून, हात जोडून अंतःकरणपूर्वक परमेश्वराला नमस्कार करत असताना पाहून नास्तिक असणा-या अवचटांना "माणूसपणाची एवढी तरी खूण इथं शिल्लक आहे" याचे समाधान वाटते· याचा अर्थ चांगलं जीवन जगण्याची उर्मी सगळ्याच माणसांना असते· या नकली जगण्यातून बाहेर पडण्याचा मार्ग समाजाने करून दिला तर ती आनंदाने संसार करेल· प्रबोधन, जटा निर्मूलन, निरक्षरता निवारण इत्यादी शिबिरातून तिचे हे दास्य कमी होत आहे· शासनानेही हे वास्तव स्वीकारलेले दिसते· महात्मा फुले प्रतिष्ठानचे कार्यकर्ते निपाणी, गडहिंग्लज ते मुंबईच्या वेश्या वस्त्यांपर्यंत पोहोचताना दिसतात·

समाजातील या प्रथा समाजाचे स्वास्थ्य टिकवण्यासाठी हव्यात· हॉटेल बॉय, हमाल किंवा ट्रक ड्रायव्हर महिना-महिना घरापासून दूर राहतात आणि समाजातील "एक्सेस सेक्स"भागवण्यासाठी ही वेश्या व्यवस्था पाहिजे हा मोठा गैरसमज आहे, त्यासाठी वास्तवात त्या ट्रक ड्रायव्हर आदींना त्यांच्या त्यांच्या संसारात कसे राहता येईल याची व्यवस्था करावी हा झाला उपाय, अन्यथा या चुकीच्या सामाजिक कल्पना, रूढींचे बळी या स्त्रिया होतात·

अनिल अवचट या स्त्रियांच्या जीवनासंदर्भात वास्तववादी बदल सुचवतात, "या वेश्यांना धोकादायक घरातून सुरक्षित घरात हलवणं, सावकाराच्या कर्जातून मुक्त करणं, घरवालीचा निम्मा वाटा कमी करता येईल तेवढा कमी करणं, सक्तीने मुली पळवून बाजारात आणणा-यांना कडक शिक्षा ठोठावणं."[१४] अर्थात या सुधारणा पूर्ण बदलाच्या नाहीत किंबहुना "वेश्या व्यवसाय समाजातून नष्ट होणार नाही, त्यामुळे अवचट सुधारणेच्या नावाखाली या व्यवस्थेचे छुपे रक्षकच आहेत असा आरोप झाला तरी तो स्वीकारायला तयार आहेत कारण एका स्त्रीचे आजचे बकाल अमानवी जीवन थोडेफार तरी सोयिस्कर झाले पाहिजे. कारण संपूर्ण बदल येईपर्यंत कामाठीपु-यातल्या जुन्या इमारती कोसळायच्या थांबणार नाहीत. उद्ध्वस्त आयुष्ये नेस्तनाबूत व्हायची, त्यामुळे अवचटांचा वास्तववादी विचार प्राप्त परिस्थितीत स्वीकारावा लागेल. त्याची गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे, हे वास्तव वाचकही मान्य करतो म्हणजेच व्यवस्थेत अडकलेली ही यातनायंत्रे थोडी उलटी फिरवावी लागतील. ही अवचटांची अपेक्षा रास्त आहे, परिवर्तन कार्याची सुरूवात आहे.

कलावंत स्त्री मधील कलेपेक्षा शरीराला महत्त्व देऊन तिच्याकडे भोगवस्तू म्हणून पाहणा-या समाजाचा सूर, ताल, हा अवचटांच्या चिंतनाचा विषय होतो. समाजातील मध्यमवर्गियांना त्यांचीच दुःखे मोठी वाटतात, पण येणा-या सुजाण तरूणाला तसे करून चालणार नाही, त्याने सामाजिक बांधिलकी स्वीकारून या स्त्रियांचे दैन्य दूर करण्याचा प्रयत्न केला पाहिजे अन्यथा "या समाजात मस्तवाल श्रीमंतांच्या रखेल्या बनण्यासाठी अशा जाती निर्माण होतात की तीत जन्मणा-या लहान मुलीच्या पायावर जन्मतःच घुंगराच्या बेडया रेखलेल्या असतात."[१५] अवचटांचे सामाजिक बांधिलकीची जाण असलेले मन तरूणांना आवाहन करते, कारण निरोगी, निर्भर समाजजीवनासाठी हे करणे गरजेचे वाटते.

देवदासी ही समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा, जातीयवाद याची निर्मिती आहे. हे वास्तव आपण जाणीवपूर्वक स्वीकारले पाहिजे. तळागाळातील महार, मांग, लमाण यांचे अज्ञान, अंधश्रध्दा, देवभोळेपणा, देवाची मनातील भीती, वाईट प्रथा यातून ही स्त्री देवाला सोडली जाते. त्यामुळे तिला संसार नाही, प्रेमासाठी संतान नाही, तारूण्य ओसरल्यावर आसरा नाही, देवी यल्लमाचे भय, दास्य तिच्या मनातून जात

नाही असे क्लेशकारी जीवन जगणारी ही स्त्री स्वतःच्या नशीबाला दोष देते.

"देवदासी प्रथा निर्मूलन परिषदे"तून तिला "स्व"ची जाणीव झाली आहे. प्रथेविरूध्द बंड करू लागली आहे हे वास्तव चित्र लेखकाला आशावादी वाटते.

यंत्रमाग, हळद, थिएटर कामगार ही शोषितांची शापित जमात आहे. लोकशाही राज्यात मालक-कामगार यांच्यातील दरी वाढते आहे. यंत्रयुगात यांत्रिक शिस्त येण्याऐवजी माणूसपण हरवते आहे, माणसे यंत्रवत बनताहेत. या व्यवस्थेत जन्मलेल्या मुलांची आयुष्ये करपून जाताहेत, स्त्रिया स्त्रीत्व हरवून बसत आहेत. षंढ पुरूष मूग गिळून बसतात, या सा-याकडे बेफिकीर वृत्तीने पाहणा-या मालकांमुळेच या कामगाराच्या आयुष्याचे वस्त्र काटेरी बनले आहे.

या वंचित, दुर्लक्षित समाजाच्या व्यथा नि वेदना पाहून स्वतःचे कळवळणारे मन आणि संवेदना लेखकाला वांझोटया वाटतात. हे वास्तव मान्य करूनही संघटनात्मक पातळीवर लक्ष देणे गरजेचे आहे. हा लढा देताना याही परिस्थितीत धंदा वाढत राहील अशा बेताने, मालक धंदा उठवून अधिक मागास प्रांतात न जाईल अशा धोरणानेच, हा लढा दिला पाहिजे. अवचटांचे वास्तव तपासणारे पण चिंतनशील असणारे मन याची सूचना देत राहते. सरकारने कमिशने नेमावी पण त्यापूर्वी टेक्समार्कची कडक तपासणी करावी म्हणजे यंत्रमाग फॅक्टरीला फॅक्टरी अॅक्ट लागेल, बारा तासाची पाळी आठ तासावर येईल, वहिफणीसाठी लहान मुलांच्या कामावर बंदी येईल. स्त्रियांची रात्रपाळी पर्यायाने स्वैर जीवन थांबेल व श्रम करणा-यांचा सुखी समूह निर्माण होईल. ही अवचटांची वास्तववादी, चिंतनशील भूमिका आहे. या भूमिकेमागे प्रस्थापितांविषयी श्रीमंताविषयी अवचटांना आकस नाही, राग, संताप, त्वेष नाही, पण अमानवी प्रवृत्तींची चीड आहे. या वास्तवामागे कृतिशील, रचनात्मक, विधायक, समन्वयाची भूमिका आहे, त्याप्रमाणे वैचारिक पातळीवर प्रस्थापितांना व प्रचलित व्यवस्थेला टक्कर देण्याची त्यांची तयारी आहे.

अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाजांचे दर्शन :-

"धागे आडवे उभे" मधील मानवीसमूह म्हणजे अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज आणि परंपरा, यांचे बळी आहेत. या गरीब समूहाला श्रध्दा आणि अंधश्रध्दा यातला

फरक कधी समजला नाही, किंबहुना अंधश्रध्देचा पगडा इतका की, "तिशी, पस्तीशीची, रोगजर्जर होऊन पडलेली, शहरातून परत आलेली जोगतीण, गावात भीक मागून खाणा-या जख्ख म्हाता-या आईच्या आश्रयाला ती आली होती· कुणाच्या झाडपाल्याच्या औषधाने ती मरणाच्या अधिकच जवळ गेली होती· आई तिला वारा घालत होती· मुलगी मरायला टेकलेली आणि यल्लमाला साकडे घालत होती, नवस बोलत होती, "उदं···उदं···उदं···।"[१६] असे आयुष्य अंधश्रध्देतून मृत्यूवर फेकले जाते·

अघोरी, अमानवी देवदेवता, नवस, व्रतवैकल्य, अंगात येणे, देव सांगणे, गंडा, दोरा, ताईत या समूहांना जीवनाविषयी अंध बनवतात, संकुचित करतात, माणसाने माणसांपलिकडे पहायचे असते या व्यापक भावनेचा या समूहांना स्पर्शच होऊ देत नाहीत· उलट त्या त्यांच्यातील माणूसपणच संपवून टाकतात·

देवदासीने यल्लमा देवीचे स्वीकारलेले दास्य, मनातील भीती ती विचारांच्या पातळीवर स्वीकारायला तयार होत नाही· त्यामुळे आजही लज्जा राखण्यापुरत्या लिंबाच्या डहाळ्या बांधून उन्हातान्हात डोंगर चढणा-या जोगतिणीचा प्रवास वेश्या व्यवसायापर्यंत जातो आहे, तर फौजदाराची सुशिक्षित बायको मूल पाहिजे म्हणून उघडया अंगावर लिंब बांधून डोंगर चढण्याचे नवस करताना दिसते, याचा अर्थ बौध्दिक सामर्थ्य असलेला वर्ग ही अंधश्रध्दा डावलण्याचे मानसिक सामर्थ्य नसलेला आहे हे अवचट स्पष्ट करतात·

सामान्य गरीब माणसे आईचा कोप झाला म्हणून खांडक ﴾खरूज﴿ झाली असे समजून ती मुलगीच देवाला सोडून देतात आणि एका जीवाचा बळी या देवदासी प्रथेला देतात·

या प्रथेला खतपाणी घालण्यात आई-बाप, भाऊ हे जबाबदार आहेत कारण मुलगी अशी देवाला सोडली की धंदा करू लागते, कुटुंबासाठी चार पैसे मिळवू लागते, देवीचे पुण्यही पदरात पडते अशी ही अगतिकता प्रथा रूजण्याला कारणीभूत आहे·

"झुलवा लावणे" व 'मोडणे' या दोनही गोष्टी अघोरी, स्त्रीला वेश्या बनवणा-या आहेत, पण ही प्रथा समाजमान्य आहे· "देवाशी लग्न लावून" देवदासी झालेली ही स्त्री पुजारी, पुढारी नि गावातील काही माणसांची सोय बनते·

या स्त्रियांचे उपवासही खडतर, चमचाभर जेवले तरी नायटा होतो, नावे ठेवली की अद्दल घडते· पुरूषाची बाई होते, असा या सामान्य माणसांचा समज आहे·

"देवदासी प्रतिबंधक कायदा" अंमलबजावणी १९३४ पासून आजतागायत होत नाही· कुणावरही एकही खटला भरला गेलेला नाही· बेळगावच्या विभागीय कमीशनरना डी·एस·पी·ना या प्रथेला कायदेशीर विरोध करण्याचे धाडस मनातील देवीच्या भीतीपोटी झालेले नाही· कारण खूप जण या देवीचे भक्त आहेत, तिच्या विषयीचे धार्मिक भय त्यांच्याही मनात आहे· असा हा परिवर्तनाचा बौध्दिकतेचा, वैचारिकतेचा पराभव या मानसिक अंधश्रध्देमुळे होताना दिसतो·

देवदासीने झुलवा लावून कुणाची तरी रखेली म्हणून रहावे ही जातीत व कुटुंबात मान्य असलेली बाब आहे·

वेश्यांच्या वस्तीतील यल्लूबाई, मीराबाई, कृष्ण, साईबाबा, हाजीमलंग, बुध्द यांची पूजा करणारी, पांढरे वस्त्र लेवून उपवास करणारी ही स्त्री खूप अंधश्रध्दाळू, देवभोळी आहे·

समाजातील अज्ञानामुळे या स्त्रियांच्या वाटयाला हे वेश्यांचे जीवन आले आहे, कारण मूल होत नाही म्हणून नवरा टाकून देतो, कधी फक्त मुली झाल्या म्हणून टाकून देतो, तर कधी हुंडा प्रथेमुळे लग्न होत नाही म्हणून तर "तलाक"पध्दतीमुळे बेवारशी ठरलेली मुस्लीम स्त्री पोट भरण्यासाठी या पेशात येते· कधी यातलीच स्त्री शूचिर्भूत होऊन प्रसन्न चेह-याने देवासमोर उभी राहताना दिसते· तेव्हा याही स्त्रीत माणूसपणाची खूण लेखकाला दिसून येते· कुत्रा पाळण्याचा तिचा शौक जीवनातील प्रेमाचा अभाव प्रगट करतो· हिंदी फिल्मी जग यांच्या जगण्याला स्वप्न देते, भासमयता निर्माण करून हे घृणास्पद आयुष्य भोगण्याचे सामर्थ्य देते·

अशा या शोषित स्त्रियांचा, वेश्यांच्या दारात, खिडकीत बसलेला घोळका पाहिला की लेखकाला "सैबेरियातून आलेल्या रंगीबेरंगी पक्ष्यांची आठवण होते·"[१७] नेपाळी मुलीचे ते मुकाट शांत बसणे पाहून अवचटांना "खाष्ट मास्तरणीने वर्गात डांबून बसवलेल्या शाळेतल्या मुलांची आठवण झाली"[१८] ही जीवनाची शाळा वेगळीच होती· वेश्यांच्या वस्तीतल्या "कॉट" लेखकाला त्यांच्या व्यवसायाच्या "सिंबॉल" वाटतात, तर नेपाळी वेश्या म्हणजे

"पैसे मिळवून देणारी गोरी जनावरेच"[१९] वाटतात. जनावरांचे जिणे जगणारी ही स्त्री म्हणजे "केळाच्या साली" सारखी, "कच-याचे ढीग" त्यांच्या जीवनाचीच प्रतीके आहेत. "आपल्या गळयात बांधलेले देवीचे "दर्शन" देवदासीने मरण्यापूर्वी दुसरीच्या गळयात अडकवले नाही तर तिचे प्रेतही जाळले जाऊ शकत नाही" हा संकेत, ही प्रथा पिढयानं पिढया विना अडथळा चालू रहावी या व्यवस्थेसाठी निर्माण झाला आहे."[२०] हे "दर्शन" म्हणजे गुलामगिरीचे स्त्रीने स्त्रीच्या गळयात बांधलेले दावे आहे. त्यामुळे महार जातीत देवदासींची खाणच निर्माण झाली, त्यामुळे "इंजिनाने पाण्याचा उपसा करावा तसा मुलींचा उपसा करता येतो."[२१] या देवदास्यांना वेश्या म्हणून "पाईपलाईनने पाणी आणावं तसं त्यांना शहरात आणता येते."[२२] हे अवचटांचे समर्पक प्रतिमांचे उपयोजन आशयाला एक वेगळा परिणाम देऊन जाते.

अज्ञान, अंधश्रध्दा, सामाजिक कल्पना, रूढी यांनी सामान्य माणसाचे जीवन विस्कटलेले आहे, त्यांचे माणूसपण कोमेजले आहे. अशा या यातनाचक्रात सापडलेल्या अत्याचारग्रस्त मानवसमूहाला या प्रचलित व्यवस्थेतून बाहेर काढणे हे "माणूस" म्हणून आपले कर्तव्य आहे, हा सामाजिक बांधिलकेची जाणं व भानं असलेला आशयपूर्व विचार संपूर्ण "धागे आडवे उभे" या ग्रंथातून लेखकाने मांडला आहे.

## अभिव्यक्तीचे विशेष :-

अनिल अवचटांच्या "धागे आडवे उभे"मधील आशयाची वैशिष्टये पाहिल्यानंतर यापुढे आपण अभिव्यक्तीच्या दृष्टीने त्याचे विशेष पाहणार आहोत.

अवचटांचे लिखाण वाचकांच्या मनात एक वैचारिक मंथन सुरू करणारे आहे. प्रचलित व्यवस्थेत सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणा-या मानवसमूहाचे लोकजीवन वाचकाच्या नजरेस आणणारे आहे. स्वातंत्र्य समतेचे तत्व, व्यापक जीवनदृष्टी, सामाजिक जाणीव उदयाला आली पाहिजे. ही सामाजिक प्रेरणा अधिक प्रभावीतपणे त्यांच्या ललित लेखनात अभिव्यक्त झाल्यामुळे अनिल अवचटांच्या ललित गद्य लेखनाला एक आगळे परिमाण लाभले आहे.

**दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन :-**

वेश्या, देवदासी, तमासगीर स्त्री, हळद, यंत्रमाग, थिएटर कामगार, वह्याफणी करणारे बाल कामगार, कांडी मशीनवर काम करणारी स्त्री, या समूहातील प्रत्येक माणसाला वाढण्याची मर्यादा आहे, त्यांच्या निर्मितिक्षमतेचा, जगण्याच्या उर्मीचा नाश परिस्थितीच्या दडपणाखाली होतो आहे. अशा प्रकारचे जगणे हे मरणासारखेच आहे. अवचटांना तर हे "दबलेल्या माणसांचं जीणं" माणसाच्या खुनापेक्षा भयंकर वाटते. या लेखांच्यामधून माणसाच्या दबलेल्या माणूसपणाचे प्रत्ययकारी दर्शन प्रातिनिधिक स्वरूपात लेखकाने घडविले आहे. उदाहरणच पाहू.

"या बाजारात सगळ्याच माडीवाल्या नसतात, काहीजणी रस्त्यावर उभं राहून धंदा करतात. काही तर गावात राहून संसार करणा-या, पण भागत नाही म्हणून दुपारच्या वेळी येऊन धंदा करतात. घरच्यांना वाटतं, कामावर जाते. ही इकडे गि-हाईक पटवते आणि इकडं या वाडयात आणते. इथले बि-हाडकरू एखादी खोली या कामासाठी ठेवतात. गि-हाईकामागे दोन रुपये घेतात. त्यात दोघाचीही सोय होते. खाटेमागे वीस-पंचवीस रुपये यांना रोजी मिळत राहतात. काय वाईट आहे?" [२१]

वेश्यांच्या वस्त्या म्हणजे "बाजार" आहे. भाजी, मासळी किंवा जनावर बाजारात जनावरे विकली जातात तशी स्त्री येथे विकली जाते, जीवनमूल्यांचाच बाजार या ठिकाणी मांडला जातो, त्यामुळे कामाठीपु-यातली वेश्या वेगळी तर नेपाळीचा भाव अधिक, अशी वर्गवारी या बाजारात आहे. ज्यांच्याकडे तारूण्य, रूप, कौशल्य असेल तिला माडी, तर ज्यांच्यात कौशल्यांचा अभाव त्यांना रस्त्यावर उभे राहून धंदा करावा लागतो. जवळच्या गावातील संसार ओढणारी स्त्री पैसा पुरत नाही, घराचे खानदान तरी सांभाळले पाहिजे अशा परिस्थितीतही स्त्री सोपा मार्ग म्हणून धंदा करणे स्वीकारते, घरी कामावर जाण्याचे नाटक करते, पण काम तरी कुठे मिळते, घर तरी चालले पाहिजे म्हणून घरच्यांना फसवून धंदा करते त्याबरोबर स्वतःलाही फसवत असते हे परिस्थितीखाली दबलेल्या गृहिणीचे वेश्येत झालेले रूपांतर अधःपतित जीवनाचे दर्शन आहे. तर दुस-या बाजूला ब-यापैकी परिस्थिती असणारे बि-हाड, पैशासाठी तडजोड करून घरातील एक खोली गि-हाईकामागे दोन रुपयेप्रमाणे भाडयाने देतो. तिथे त्याचे "घरपण" संपते,

बि-हाड, या शब्दाचा भावनिक अर्थच बदलून जातो· बि-हाड म्हटले की, पूर्वीच्या चाळीतले एक ब-यापैकी सुखी, संपन्न कुटुंब असे चित्र डोळ्यासमोर येते, आज तेच "बि-हाड" पैशासाठी अगतिकतेने तडजोड स्वीकारते, दोघांचीही सोय होते, काय वाईट आहे ? हा प्रश्न उभा राहतो तेव्हा माडीवाली, गाववाली गृहिणी, "बि-हाड"वाले सारेच अधःपतित जीवन जगणारे आहेत, अशा परिस्थितीने दबलेल्या माणसांचा समूह वाढू लागला तर मूल्याधिष्ठित जीवन राहणार नाही याची काळजी लेखकाला वाटते, त्यामुळे दबलेल्या माणसांचे स्वरूप मध्यमवर्गीयांच्या उंब-यापर्यंत येऊन पोहोचले आहे याचे अवचटांनी प्रत्ययकारी दर्शन घडविले आहे·

"या पाटर्या त्या त्या गावात उप-या असतात· मुळातले अडाणी, त्यात ही परिस्थिती· त्यामुळे कोकरासारखी अवस्था झालेली असते· थिएटरमालक म्हणजे तर यांच्या दृष्टीने सर्वसत्ताधीश असतो· तो चांगला असेल तर परिस्थिती बरीच सह्य होते· पण तो खराब असला की वाटेल तेवढी वाईट होऊ शकते· पूर्वी काही थिएटर्सना चांगल्या मालकांची परंपरा होती· ते पाटर्यांना मुलांसारखे वागवीत· आता बरीच थिएटर्स तिथं येणा-या सधन उल्लू गि-हाईकांनी विकत घेतलेली आहेत· त्यामुळे लावलेल्या पाटर्यांमधल्या देखण्या मुली उपभोगणे हाच मालकाचा उद्देश असल्याने मनात असो किंवा नसो स्त्री कलावंतांना आपली अब्रू कलेच्या दारात टांगून ठेवावी लागते·"[२४]

तमासगीर पार्टी आणि त्यातील स्त्री हिच्या दबलेपणाचे, बेअब्रूचे टांगलेले चित्र प्रत्ययकारी आहे· या तमासगीरांचे जीवन उपरे, असुरक्षित, समाज त्यांना आपले मानत नाही· या स्त्रिया म्हणजे कलावंत असून भोगवस्तू समजल्या जातात, थिएटरमालक त्यांचे प्रचंड शोषण करतो, पूर्णतः ती त्याच्यावर अवलंबून असते, खेळ कुठे, किती वाजता हे तो ठरवतो, बिदागी जास्त मिळेल अशा मोक्याच्या जागी लावावे म्हणून त्याची मर्जी सांभाळावी लागते, एखादी मुलगी मागितली तरी द्यावी अशी तिची कोकरासारखी अवस्था झालेली असते असे तिचे दबलेपण अवचट रेखाटतात· अवचट म्हणतात, जवळ तंबू, दो-या, तरूण मुली अशा नाशवंत वस्तू असतात· आणि या सत्ताधाशांकडून, प्रस्थापितांकडून केव्हाही बळी जाऊ शकतात याची प्रचंड भीती घेऊन या पाटर्या गावागावात फिरत असतात· पूर्वी मूल्याधिष्ठित जीवन होते, कलावंताला एक आदराचे स्थान असायचे· या कलावंताला पोरासारखे वागवणा-या थिएटर मालकांची एक परंपरा होती, आधार

होता, आजही थिएटर उनाड, उल्लू, कलेशी कसले नाते नसलेल्या सधन गि-हाईकांनी विकत घेऊन या कलेच्या धर्माला धंद्याचे रूप दिले आहे, त्यांचा उद्देशच मुळी या पाटर्यांमधील देखण्या मुली उपभोगणे हा आहे, त्यामुळे असहाय , अगतिक , दबलेल्या या माणसांना कलेच्या नावाखाली या सैतानी प्रवृत्तीच्या हाती आपली अब्रू द्यावी लागते, आणि बेअब्रूचे जिणे घेऊन या पाटर्या महाराष्ट्रभर फिरत असतात. साहित्यशास्त्र कला विनोदाने समाज संपन्न होतो, असे म्हणतात. तर इथे ती कलाच बेअब्रू बटीक झालेली दिसते हे दबलेल्या मानवसमूहाचे विदारक चित्र आहे.

"अशा भीषण परिस्थितीत अपघात होतात, त्यांना तात्काळ भरपाई मिळणे दूरच, पण त्यालाच कोर्टकचे-या करायला लावतात, हा आमचा नोकरच नव्हता असे याचं रेकॉर्ड तयार करतात. आधी अपघातामुळं अपंग झालेला हमाल कसाबसा बरा होतो, त्याला कोर्टकचे-या करण्याची ताकदच नसते. मग दोन-चारशे रुपये घेऊन मालक म्हणेल तिथं अंगठे उठवून तो गावी मजुरी करायला निघून जातो. त्याची जागा घ्यायला इतर अनेकजण इथं तयार असतातच."[२५]

परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडून जाणा-या कामगाराचे हे चित्र आजच्या यंत्रयुगातही बदलले नाही. मालकांची अन्यायी, अमानवी प्रवृत्ती शोषणाचीच आहे. समता, बंधुत्व ही लोकशाही जीवनमूल्ये त्याला स्पर्श करीत नाहीत. या कामगारांचे रक्त शोषून "मार्जिन" वाढवताना आपण काही वाईट करतो आहोत या भावनेचा स्पर्शही त्याच्या मनाला होत नाही इतका निर्लज्ज असलेला हा वर्ग, कामगारांचे अज्ञान, अशिक्षितपणा आणि दुष्काळ या परिस्थितीचा फायदा घेते, एखाद्या भयंकर अपघातात त्या कामगाराला सहानुभूती, भरपाई न देता, कोर्टकचे-या करण्याची ताकद नसते, परिस्थितीच्या दडपणाखाली त्याची कोंडी केली जाते, शे-दोनशे रुपये मालकाकडून घेऊन हवा तिथे त्याचा अंगठा घेतला जातो. गावातला पोटासाठी धडपडणारा, शहराचे आकर्षण असणारा जगण्याचे स्वप्न घेऊन, अज्ञान दुष्काळासह कामगार या मालकांकडे येतो, मालकाच्या मार्जिनमध्ये काही बदल नाही, मात्र हा सामान्य माणूस चांगल्या जीवनाच्या विश्वातून वजा होताना दिसतो.

दबलेल्या माणसांच्या या प्रत्ययकारी चित्रातून अवचटांचा प्रश्न आहे तो ही विषम समाजरचना मान्य करायची का ? तेही लोकशाही राज्यात स्त्री-पुरूष समानतेची ग्वाही देत असताना· या विषम रचनेत तो सामन्य माणूस सापडला त्यांच्या आयुष्याचे चिपाड होत आहे, असा जीवनरस आटलेला, दबलेल्या माणसांच्या समूहातून निर्भर, स्वच्छंद, आनंदी समाज खऱ्या अर्थाने निर्माण होणार नाही, त्याच समाजाचे आपण घटक असल्यामुळे बुध्दिमान, कर्तबगार असूनही चांगले जीवन जगू शकणार नाही· हे दबलेले माणूसपण श्वापदाच्या रूपात आपल्या उंबरठयापर्यंत येऊ पहाते आहे, याचा विद्रोह, नकार समाजजीवन उद्ध्वस्त करेल· त्यापूर्वी परिवर्तनाचा विचार घेऊन, सगळ्यांसह चांगलं जीवन जगण्याचे तत्व, बांधिलकी स्वीकारली पाहिजे, मूल्याधिष्ठित जीवनासाठी लढा दिला पाहिजे· माणूस निर्भर, आंनदी ताठ मानेने सर्वत्र संचार करणारा असावा ही रवींद्रनाथ टागोरांचीही संकल्पना होती· तीच कल्पना "माणसां"विषयी असलेले अवचट दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन घडवतात·

**शहरात आलेले खेडे :-**

"खेडयाकडे चला" हा महात्मा गांधींचा संदेश या विचाराने स्वीकारला नाही, आजचे समाजजीवन पाहता त्यांच्या विचारांचे अवमूल्यन झालेले दिसते· खेडी स्वयंपूर्ण होण्याऐवजी बकाल होऊ लागली आहेत, माणसाला जगणे अवघड होऊ लागले आहे, शेती जुगाराचाच प्रकार आहे, त्यामुळे दुष्काळ, दारिद्र्य पाठ सोडत नाही· अज्ञान, अंधश्रध्दा, प्रकाश येऊ देत नाहीत, शासकीय स्तरावर पाण्याचे नियोजन नाही, साक्षरतेचा योग्य पध्दतीने प्रसार नाही त्यामुळे पोटासाठी कंगाल माणूस शहरांकडे धावू लागला आहे· शहरात त्याच्या वाटयाला बकाल, घाणेरडे जीवनच आले आहे· त्याच्या या असहाय्य अगतिक परिस्थितीचा फायदा हे उच्चभ्रू, श्रीमंत, व्यापारी, मालक, घरवाली घेतात नि त्या माणसाच्या वाटयाला शेवटी बेवारशीपण आणतात· हा सरळ, सरळ सामाजिक अन्याय आहे· याची जाण स्वतःच्या प्रगतीत गुंतलेल्यांना नाही· त्याबरोबर शहरात आलेल्या खेडयाचे भान या फ्लॅट संस्कृतीला आलेले नाही·

ही खेडी "वेश्यांच्या वस्त्या" बनून प्रत्येक शहरातील मध्यभागी महत्त्वाच्या ठिकाणी वसवताहेत· गावाकडील अडाणी, गरिबीने कंटाळलेली, शहरातून आलेल्या घरवालीच्या झगमगटाला भुलून, तिच्या मनातही शहराविषयी आकर्षण निर्माण होते, काही वेळा

ती फसविली जाते, तर काही वेळा आई-बाप, भाऊ पैशासाठी विकतात नि या गाववाली स्त्रीसह खेडे शहरात येते·

"देवदासी" ही खेडयातून येणा-या वेश्यांचो फिडींग एरिया आहे· अज्ञानी, देवभोळी पुजा-यापासून ते पुढा-यापर्यंत गावात लुबाडलेली ही जोगतीण वेश्या म्हणून शहरात येते पण तिच्यातला खेडवळपणा जात नाही, व्यवसायातले कौशल्य अडाणीपणामुळे येत नाही· नेपाळी बरोबरच्या स्पर्धेला हिचा खेडवळपणा नडतो व लवकरच ती माडीवरून रस्त्यावरून येते· वस्तीत असणारे खेडे रस्त्यावर फिरू लागते, या देवदासीची शहरात खेडयापेक्षा खूप परवड होते·

शहरात राहणारी देवदासी, गावाशी, गावच्या देवाशी संबंधित राहते, त्यामुळे तिच्या वस्तीत देवाचे फोटो, माणसे यांचे दर्शन होते· एका परीने गावाशी जोडलेली तिची नाळ तुटत नाही·

वेश्यांकडे येणारी गि-हाईके हॉटेलबॉय, फिटर, टर्नर, हमाल ही सारी मंडळी गावाकडचीच;त्यामुळेही या वस्त्यात खेडे नांदताना दिसते·

कर्नाटकातून येणारी देवदासी, नेपाळमधून येणारी शेतमजूर स्त्री, "तलाक" पध्दतीने निराधार झालेली मुस्लिम स्त्री, "हुंडा"प्रथेमुळे पैशासाठी हा धंदा स्वीकारणारी, आंध्र, केरळ या प्रदेशातील स्त्री, त्यासोबत अज्ञान, दुष्काळ, गरिबी, फसवणूक अशा परीस्थितीत सापडलेल्या स्त्रियांना हेरून या व्यवसायात हे खेडे आणणारे दलाल सर्व भारतभर गावपातळीवर पसरले आहेत· तमासगीर स्त्री तर मिश्र स्वरूपाचे जग जगते·

यंत्रमाग कामगाराचे इचलकरंजी तसे शहरवजा खेडेच आहे· त्या ठिकाणी येणारा कामगार हा खेडयातून येतो, पोटासाठी खेडे सोडलेला कामगार झोपडपट्टीचे जीवन जगतो आहे· पूर्ण शहर नव्हे, पूर्ण खेडे नव्हे, असे मिश्ररूप इचलकरंजीचे दिसते·

सांगलीतला हळद कामगार जत, कवठेमहांकाळ येथील दुष्काळग्रस्त आहे· त्यामुळे सांगलीत हे दुष्काळी खेडे शोषले जात असताना दिसते··

शहरात येणारे हे खेडे थांबवण्यासाठी खेडेच स्वयंपूर्ण केले पाहिजे, शिक्षणाचा प्रसार वाढवून अज्ञान दूर केले पाहिजे, अंधश्रध्दा हटवल्या पाहिजेत, अस्पृश्यता संपली पाहिजे, परिवर्तनाची चळवळ तरूण वर्गाने चालवून समाजात बदल घडवून आणला

पाहिजे· आज महात्मा फुले समता प्रतिष्ठान, हमाल पंचायत यांचे कार्यकर्ते हे काम करताहेत· सा-या समाजाने याला हातभार लावणे गरजेचे आहे· कारण हा मानवी हक्काचा, सामाजिक न्यायाचा लढा आहे·

## विसंगती हेरण्याचे कौशल्य :-

सतत दुर्लक्षित, अत्याचारग्रसत मानवीसमूहांच्या दुःखाचे दर्शन घडवत असताना, मानवी जीवनातली विसंगती अवचट अचूक हेरतात·

वेश्येचे जीवन तसे विसंगतीने भरलेले आहे· देवाची उपासना, व्रत वैकल्ये करणरी हीच स्त्री उत्तान चाळे करून गि-हाईक आकृष्ट करते· पांढरी साडी नेसून आयुष्याच्या भल्याची प्रार्थना करणारी, थेंबभर पाणी न घेता उपवास करणारी ही स्त्री मोकळ्या पोटी, उद्याचे पोट भरण्यासाठी धंदा करीत असते अशी ही क्लेशकारक विसंगती तिच्या जीवनात भरलेली आहे·

उच्चभ्रू प्रतिष्ठित आणि सुशिक्षित वर्गांना या सामान्य माणसांच्या हलाखीच्या शोषित जीवनाची फिकीर नसते, वाढणा-या झोपडपट्टया, वेश्यांच्या वस्त्या यांच्या चिंतेचा विषय होत नाहीत· त्यांना वाटते हे सारे आपल्यापासून दूर आहे, माझा त्याच्याशी काय संबंध अशी त्यांची कल्पना असते पण त्यांना माहीत नसते त्यांची नववीतील मुले वेश्येकडे जाऊन "सेफिलीस" जखम होऊन डॉक्टरकडून इंजेक्शन घेत आहेत· समाजाने या प्रश्नाकडे डोळसपणे न पाहिल्यानेच ही विसंगती निर्माण झाली आहे, ज्या विसंगतीमुळे या प्रतिष्ठितांना हार्ट अॅटक येऊ शकतो·

दिव्यांचा दिवोत्सव साजरा करून "दुरितांचे तिमिर जावो" आनंद निर्भर समाज राहो" असा संदेश घेऊन येणारा दिवाळीचा सण, त्याच समाजातील या वेश्यांच्या वस्त्या, दिव्यांनी झगमगलेल्या, रंगानी रंगलेल्या पण कारूण्याची एक झालर असलेल्या दररोज रात्री दिवाळी साजरी करतात, आणि ख-या अर्थाने "दिवाळीचा सण" लोकांचा चालू असतो तेव्हा या वेश्यांचा वीस गि-हाईक करण्याचा "सिझन" असतो· विसंगतीचे हे दर्शन मनाला विषण्ण करते·

मद्रासी वेश्येने लावलेले भस्म पाहून पावित्र्य आणि व्यवहार, यात खूप अंतर पडते· ही पोकळी धर्म आणि वास्तव यामधली आहे· अवचट म्हणतात, "भस्म

आणि पावित्र्य यांची लहानपणापासून मनात असलेली सांगड क्षणात सुटून गेली होती"[२६] ही टिपलेली विसंगती अवचटांच्या चिंतनशिलतेची साक्ष आहे, लेखन वैशिष्टयांचे सामर्थ्य स्पष्ट करणारी आहे·

"राष्ट्रगीत" राष्ट्रीयत्व, स्वाभिमान, देशप्रेम जागे करणारे गीत, ते चालू असताना सन्मान म्हणून स्तब्ध उभे रहावे हा झाला संकेत· पण पूर्वी थिएटरमध्ये हे राष्ट्रगीत वाजू लागलं की हा थिएटर कामगार पेंगेतून जागा व्हायचा, डयूटी संपल्याची ती त्याच्यासाठी खूण असायची· आपल्या राष्ट्रीयत्वाची, समाजजीवनातली ही विसंगती "भारत माझा देश आहे····" अशी प्रतिज्ञा करण्या-या प्रत्येक नागरिकाने समजावून घेतली पाहिजे·

१५ ऑगस्ट, २६ जानेवारी स्वातंत्र्य, समतेची ग्वाही देणारे दिवस· निपाणीतील पोलीस हे "राष्ट्रीय उत्सव" साजरे करण्यासाठी, देवदासींना धाक दाखवून परेड ग्राऊंड स्वच्छ करून घेतात· त्यांनी नकार दिला तर त्यांचा धंदा बंद पाडतात, या देशाचे नागरिक म्हणून घेण्याची लाज वाटावी अशी ही विसंगती आहे·

जैन समाजात काही मुलींना लहानपणापासून ठसवून संन्यास घ्यायला भाग पाडतात तर तमासगीरांच्या नव्या जन्मणा-या मुलीच्या कपाळावर जन्मतःच कलावंताच्या जीवनाची तप्त मुद्रा उठवली जाते आणि वैराग्याच्या उलटया दिशेने हा प्रवास सुरू होतो· समाजजीवनातली ही विसंगती आहे·

इचलकरंजीत मागणा-याला काम मिळते असे अभिमानाने सांगितले जाते, या सांगण्याला अवचटांचा प्रश्न असा आहे, पगार किती मिळतो ? आणि त्यात पोटभर जेवता येते का ? उत्तर "नाही" असेच आहे· खोटया अभिमानामागचे विसंगतीचे भान हवे हेच अवचटांना सुचवायचे आहे· अवचट समाजातील विसंगतीची दोन चित्रे वाचकांसमोर ठेवतात·

"इचलकरंजी हे दक्षिण महाराष्ट्राचं सांस्कृतिक केंद्र आहे· भारतीय संगीताची पाया भरणी करणारे बाळकृष्ण बुवा इचलकरंजीकर इथलेच· इथल्या दरबारच्या पदरी काळेबुवा, इंगळेबुवा यासारखे प्रसिध्द गवई होते· त्यामुळं इथं गाण्याची जाण असलेले बरेच लोक आहेत·"[२७] हे एक जाणकारांचे मत, "इथल्या बहुसंख्य कामगारांना मात्र पावरलूमच्या खाड्खाड् खाड्खाड् या संगीताने आपले कान बहिरे करून घ्यावे लागतात·"[२८]

हे त्याच समाजातील जीवनाचा सूर हरवलेल्यांचे चित्र, सामाजिक बांधिलकीचे भान राखले नाही तर उच्च अभिरूची, साहित्य संगीत, विनोद यांची जपवणूक या छोटया वर्गाला करता येणार नाही, हेच या विसंगती दर्शनातून लेखकाला सुचवायचे आहे. या विसंगतीपूर्वी समाजजीवनाच्या दर्शनाने वाचक क्षणभर थांबतो, विचार करू लागतो. यामध्ये अवचटांची लेखणी यशस्वी होते.

## अन्याय करणारे नि सोसणारे एकसंध चित्र :-

अवचटांनी "धागे आडवे उभे" मध्ये समाजजीवनातले एकसंध चित्र रेखाटलेले आहे. मानवता आणि आर्थिक सत्ता यांच्यातल्या संघर्षाची हकीकत म्हणजे "धागे आडवे उभे"तील लेख होय. २१ व्या शतकाकडे जाणा-या या यंत्रयुगात जीवनाचीच गती वाढली आहे, जगण्यातला संघर्ष वाढला आहे, अत्याचार करणारा नि सोसणारा हा संघर्ष अधिक तीव्र झाला आहे. अन्याय करणारे मलमली गालिच्यावरून चालत आहेत. हवेलीत राहत आहेत तर शोषणाला बळी पडणा-यांच्या आयुष्याचे चिपाड होते आहे जीवनाचे वस्त्र काटेरी बनते आहे. असा जीवनरस आटलेला समाज सामाजिक प्रेरणा विसरून जाईल अशी चिंता अवचटांना वाटते. माणसातील माणूसपणा जागा करावा, जीवनमूल्यांची जाणिव करून द्यावी, दिशाहीन प्रगतीला थांबवून "सगळ्यासह प्रगती" असे चांगले समाजजीवन निर्माण व्हावे यासाठीच समाजातील अन्याय करणा-यांचे व सोसणा-यांचे एकसंध चित्र संवेदनशील वाचकांपुढे अवचट ठेवतात.

"बरेच व्यापारी हळदीची पावडर करून, ती प्लॅस्टिक बॅगमध्ये घालून अरब देशात, युरोप, अमेरिकेत पाठवतात. त्यात बरेच मार्जिन आहे. ते त्यांनी अवश्य मिळवावं पण मग हळदीच्या धुरळ्यात उभं राहून काम करणा-या स्त्रियांचं काय ? त्यांची जबाबदारी कोण घेणार ? पंखे नाहीत, दिवे नाहीत, संडास-मुता-या नाहीत. ज्या धुरळ्यात आपल्याला पाच मिनिटे उभं राहवत नाही, तिथं दिवसातलं दहा-बारा तास उभं राहून कष्टाचं काम करायला माणसं मिळतात, म्हणून हे चाललं आहे. त्या माणसांना सुधारणांची कल्पनाही नाही, म्हणून ते त्या मागत नाहीत. मालकांना आपण होऊन त्या करण्याचे मनातही येत नाही, कारण "मार्जिन" जरासुध्दा कमी होऊन त्यांना चालत नाही.[२९]

अवचटांना व्यापा-यांच्या "मार्जिन"बद्दल राग नाही पण त्यासाठी राबणा-या माणसांना माणसे म्हणून पाहिले जात नाही· प्राथमिक सुविधा पुरविलेल्या नाहीत, इतका कमालीचा स्वार्थीपणा आणि कामगारांचे शोषण, त्यातही स्त्री कामगाराचे देखील, हे व्यापा-यांना माणूस म्हणून शोभणारे नाही, त्यात त्यांचे अज्ञान, दुष्काळ याचा फायदा स्वतःच्या "मार्जिन"साठी जीवघेणा खेळ खेळणे हे मानवतेला धरून होणार नाही· ही जाणीव देतानाच अमानवीपणे अन्याय करणारा मालक व असहायपणे सोसणारे कामगार याचे चित्र वाचकांपुढे मांडले आहे, पण हे सारे मांडत असताना अवचटांची एक समन्वयवादी भूमिका दिसून येते·

"घरवालीनं चालवलेलं शोषण आणि शहरातली निर्घृण स्पर्धा यात इथं आलेल्या देवदासीचं जीवन भरडून निघतं, पहिली पाच-सात वर्षे ती ब-यापैकी पैसा मिळवते· कमाई कमी होऊ लागली की घरवाली थारा देत नाही· रस्त्यावर येऊन धंदा करावा लागतो· रोगराई भरपूर झाली की त्यातच मरते· काही थोडयाच देवदासी म्हाता-या होईपर्यंत जगतात· उतरत्या काळात गावाकडचे, घरचे लोक त्यांना गावात अजिबात थारा देत नाहीत·"[१०]

या ठिकाणी घरवालीचे शोषण आहे· घरवाली एक स्त्री असूनसुध्दा दुस-या स्त्रीला कमाई कमी होऊ लागली की रस्त्यावर फेकते· जिच्या कमाईवर हे कुटुंब पोसते ते तिचे घरवालेही वृध्दपणी थारा देत नाहीत, रोग झाला तर कोणी औषधपाणी विचारत नाही· असे हे जवळच्या संबंधातील लोकांकडून होणारे अत्याचार ही स्त्री निमूटपणे सहन करते· या क्लेशकारी निर्घृण स्पर्धेत ही स्त्री संपूर्ण भरडून निघते, ही स्त्री म्हणजे "स्त्री" जीवनातली दुःखाची परिसीमाच आहे·

"गावात पार्टी आली की, या मुली सगळ्यांच्या उपभोगासाठीच आहेत· यांना कसली आलीय अब्रू असे गाव मानूनच चालते· एका ठिकाणी एका पार्टीतल्या मुली कार्यक्रमानंतर कपडे बदलत असताना बरेच जण त्यांच्या तंबूत शिरले· फडाच्या मालकीणीने अडवतातच त्या मुली आमच्याकडे पाठवा, म्हणजे तुमच्या तंबूचे नुकसान होणार नाही असे म्हणाले· मालकिणीला दोन मुली त्यांच्याकडे पाठवाव्या लागल्या· त्यातली एक तर तिची धाकटी बहीणच होती·"[११]

गावातला सधन वर्ग, पुढारी, पाटील आणि अगदी सामान्य प्रेक्षकसुध्दा या स्त्रिया म्हणजे उपभोगासाठीच आहेत असं समजून त्यांच्याशी सारा व्यवहार करतात· ते कलावंत आहेत याचे या मस्तवालांना भान राहत नाही, तंबूचे नुकसान करण्याची धमकी देऊन वापरण्यासाठी मुली नेतात, निर्लज्ज तर इतके की कपडे बदलण्याच्या पटात शिरण्याचे धाडस करतात· त्यांना या स्त्रिया विरोध करू शकत नाहीत· उलट पोटासाठी बहिणीला त्यांच्याकडे पाठवून द्यावे लागते तेव्हा सोसणाऱ्यांच्या सहनशीलतेची हद्द वाटते·

कोसळणाऱ्या मूल्याधिष्ठित जीवन दर्शनाने लेखकाच्या मनाला वेदना होतात तेव्हा तो शोध घेऊ लागतो आणि हे एकसंध चित्र साकार होते· अन्याय करणा-यांचे व सोसणा-यांचे हे स्पष्ट चित्र मांडून, समस्या सोडविण्यासाठी स्पष्ट मौलिक दृष्टिकोन समाज मनात निर्माण व्हावा असेच लेखन अवचटांनी केले आहे·

<u>चित्रकार अवचट</u> :-

अनिल अवचटांचे वैशिष्टयपूर्ण रिपोर्ताज पध्दतीने लिहिले जाणारे, एकाच वेळी वैचारिक व ललित असे दुहेरी पातळीवर समर्थ गद्य लेखन ठरते· त्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी, वेगवेगळ्या स्तरावर घेतलेल्या अनुभवांचे चित्रमय कथन करण्याची त्याची हातोटी हेही एक त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय आहे·

या माणसाचा पिंड चित्रकाराचा आहे, संवेदनशील मन, अचूक निरीक्षण शक्ती, कधी हवा असणारा तटस्थपणा, मनाचा सांभाळलेला हळवा कोपरा, त्यामधील भावविश्वाचे "धागे आडवे उभे" वाचकांसमोर गुंफताना माणसे, घटना, प्रसंग, स्थळे ह्या साऱ्याचे छायाचित्रण करावे तसे वर्णन त्यांच्या लेखनात येते·

"वस्त्या वेश्यांच्या" लेखाची सुरूवात मोठी चित्रमय, उत्सुकता वाढविणारी, वाचकाला विषयांकडे सहज घेऊन जाणारी गतिमान अशी आहे· एखाद्या सिनेमाची बंदिस्त पटकथा असावी तशी, त्याप्रमाणे ते दृश्य वाचकांसमोर येते· उदा·"दहावीत असताना एकदा संध्याकाळी मंडईजवळ भटकता होतो, अचानक एका गल्लीत शिरलो, तिथलं दृश्य विलक्षण होतं· रस्त्यावरच्या खाटेवर पन्नाशीची काळी स्थूल बाई बसली होती· पदरच घेतलेला नव्हता· ब्लाऊजही भडक हिरव्या कापडाचा· आईच्या वयाची ही बाई· अशा पध्दतीने बघायची सवय नव्हती· रस्त्यावर अनेक तरूण मुली चेहरे

रंगवून उभ्या· मला एकीने हात करून बोलावलं· एरवी कोणीही बोलावतो तेव्हा आपण थांबून 'काय' म्हणून तरी विचारतो· इथं असं थांबायची सोयच नव्हती· तोपर्यंत दुसरी काहीतरी फिल्मी हावभाव करीत 'अरे प्यारी !' असं म्हणून बोलावू लागली· मी एव्हाना गल्लीच्या मध्यावर आलो होतो· पुढंही रस्ते, जिने अशाच स्त्रियांनी भरलेले दिसले· एक बाई तर रस्त्यावरच्या माणसाला ओढत होती· मी दडपूनच गेलो· खाली मान घालून जो झपाटयाने निघालो तो चौकात गेलो तेव्हाच वर पाहिलं·"[३२]

शॉट कट····वाचकांच्या समोर वेश्यांच्या वस्तीचे चित्र उभे राहिले, नायकही पौगंड अवस्थेतला· ते विलक्षण दृश्य त्याला नवखे आहे· त्याबरोबर वाचकालाही कुतूहल आहे· उथळ नि भडक रंग, आई आणि बाई ही दोन्हीही चित्रे एकदम मनःपटलावर येतात· त्या पाठोपाठ ती फिल्मी हावभाव, गि-हाईकाला खुणावणे, ओढणे सगळेच घृणास्पद बाजार भरावे तसे दृश्य· एका वेगळ्या जगाचे वाचकांच्या मनावर दडपण येते आणि वेश्यांचा जीवनपट उलगडत जातो·

"वरच्या बाल्कनीतले लोकही जिन्यावरनं उतरू लागले· जिना पूर्ण भरून गेला· वर नुसती डोकी डोकी असलेला, भला मोठा एखादा पदार्थ हळूहळू वाहत यावा, असं वाटलं प्रत्येक चेहरा किती वेगळा होता ! वाटलं या डोअरकिपर लोकांचे हाल असतात् हे खरं !"[३३]

"एक अंधारातलं जग" या लेखामधील सिनेमा संपल्यानंतर उतरणा-या लोकांच्या समूहाचे चित्रमय वर्णन आहे· डोकी असलेला, हिमनगासारखा वाहणारा पदार्थ या अशा "मास"(समूहा)शी पंधरा तास काम करून डोअरकीपर किती थकत असेल याची कल्पना या चित्रातून येते·

"पाडाच्या खालून एका अंधूक दिव्याच्या प्रकाशात धुळीने भरलेला हमाल येत होता· मागून पडणा-या अंधुक प्रकाशात त्याचे पिंजारलेले केस उजळून दिसत होते· गुहेतून बाहेर पडणा-या श्वापदासारखे वाटले ते मला !"[३४] किंवा "काही सेकंदातच सावरलो, समोर हमालाचो काळी आकृती दिसली· तो म्हातारा होता· कमरेला लंगोटी होती· पूर्ण उघडा होता· घामाने थबकलेला असल्याने कंदिलाच्या प्रकाशात चमकत होता· मला आपण एखादं जनावर पाहतोय असं वाटलं"[३५] यंत्रयुगातील माणसाचे

श्वापदासारखे रेखाटलेले जीवन पाहून मर्ढेकर, सुर्व्यांच्या कवितेतला कामगार डोळ्यांपुढे उभा राहतो·

अवचटांच्या चित्रकार मनाने समाजजीवनातील टिपलेले हे अनुभव त्यांनी स्वतःशी प्रामाणिक राहून रेखाटलेले आहेत· त्यामुळे ते शब्दबध्द होताना त्यांच्या चित्रमय कथनशैलीला एक अंगभूत व्यापकपणा येतो· वैचारिकतेच्याही पलीकडे मानवतेच्या दृष्टीने ही लेखनशैली जाते· तेव्हा कलात्मकतेचे एक उच्चतम रूप आपणासमोर साकार होते·

कार्यकर्ते अवचट :-

अनिल अवचटांच्या लेखनात जसा एक चित्रकार आहे, तसा एक कार्यकर्ताही आहे· जे समोर दिसते ते काम करावयाचे, जसे दिसते तसेच मांडावयाचे, मांडताना चिंतन करावयाचे· माणसांसाठीची जी चिरंतन मूल्ये असतील त्यांचा शोध घ्यायचा, मूल्यांचे महत्त्व समाजाला पटवायचे, त्यांची माणूसपणाची अस्मिता जागी करून, सर्वांसह एक चांगले, एक माणूस म्हणून अभिमान वाटेल असे जीवन सर्वांनी जगावे ही त्यांची धारणा आहे· समाजात वावरत असताना त्यांना आहे रे आणि नाही रे अशी भूमिका नको आहे· जे जीवन असेल ते सर्वांसह स्वीकारायचे, पुढे नेण्याचा प्रयत्न करावयाचा· ऐहिक भोगलालसेचा खेळ नाकारून समाजातल्या सर्व थरातल्या सुशिक्षित सुजाण तरूणांनी कार्यकर्ते बनून परिवर्तनासाठी सज्ज झाले पाहिजे· या यातनायंत्रात सापडलेल्या मानवीसमूहाच्या समस्या सोडविण्यासाठी तीव्रता कमी करण्यासाठी लढा उभा केला पाहिजे· हे त्यांचे मत महात्मा फुले प्रतिष्ठानमधून कृतिशिल काम करताना झाले आहे· गडहिंग्लज, निपाणी परिसरातील "देवदासी जटा निर्मूलन" चळवळीमध्ये काम करणा-या तरूणांकडे पाहून बनलेले आहे· त्यामुळे समाजातील सर्व तरूणांना ते आवाहन करत असताना दिसतात·

अवचट या कार्यकर्त्या मनाचे एक वैशिष्ट्य आहे ते लेखनात स्पष्ट प्रतिबिंबित होते जेव्हा एखाद्या अत्याचारग्रस्त पण दुर्लक्षित मानवसमूहाची समस्या मांडत असतात, तेव्हा प्रत्येक वेळी ते माणसाच्या मनाशी येऊन भिडतात·

देवदासी, वेश्या, कामगार यांच्या जीवनातील प्रचंड आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषणाची समस्या विचारात घेतानाही शोषणापेक्षा, शोषणाला मान्यता देणारी,

खतपाणी घालणारी प्रवृत्ती अधिक घातक असल्याचे अवचट लक्षात आणून देतात· ही प्रवृत्तीच मुळासकट उपसून काढली पाहिजे· त्यासाठी या यातनायंत्रातील समूहांना ज्ञानी केले पाहिजे· श्रध्दा, अंधश्रध्दा यातील फरक समजण्याइतका विवेक त्यांच्यात निर्माण केला पाहिजे· समाज निर्भर, आनंदी, निरोगी बनवून माणूसपणाची, मूलगामी विचारांची बीजे पेरली पाहिजेत· त्यासाठी प्रस्थापितांचा विरोध सहन करून संपूर्ण यंत्रणेविरूध्द बंड केले पाहिजे· निकोप आणि पुरोगामी स्वरूपाचा समाज निर्माण होण्यासाठी अनिल अवचट मूल्यांचा शोध घेणारे सखोल लेखन करतात· "अवचट हे समाजपरिवर्तनाच्या चळवळीला क्रियाशील बांधिलकी असलेले पण कलंदरवृत्तीचे, अनेक प्रकारचे हुन्नर अंगी असलेले लेखक आहेत"[१६] त्यामुळे त्यांचे ललित लेखन अधिक सकस ठरते·

## विविध संदर्भ :-

"धागे आडवे उभे"मधील पारंपरिक, धार्मिक, राजकीय असे जे विविध संदर्भ आले आहेत ते या पीडित मानवसमूहाच्या हलाखीच्या परिस्थितीस पूरक ठरणारेच आहेत· लोकशाही पध्दत स्वीकारल्यानंतर हे पारंपरिक रिवाज, रूढी, सामाजिक कल्पना यांच्यात बदल व्हायला हवा होता· एक सांस्कृतिक वैचारिक मंथन लोकशाहीत सुरू होऊन परिवर्तनाच्या चळवळीतून समता, बंधुत्वाचे प्रेम मानवी समूहात निर्माण झाले पाहिजे· पण दुर्दैवाने तसे घडलेले दिसत नाही, उलट देवदासींच्या प्रथेतील पारंपरिकता अनेक मार्गांनी अधिक रूजवली गेली आहे· इचलकरंजीच्या यंत्रमाग कामगारांच्या झोपडपट्टीय जीवनाच्या मागे व्यापा-यांचा राजकारण्यांशी असलेल्या संबंधाचा राजकीय परिणाम आहे· या झोपडपट्टीत साक्षरता प्रसारणाचा पूर्ण पराभव होऊन निरक्षरता वाढली आहे· टी·बी·सारख्या रोगांनी माणसं जखडलेली आहेत, अपार कष्ट करून अर्धपोटी जगत आहेत याला प्रशासन, राजकीय संदर्भ जबाबदार आहेत·

देवदासी ही पारंपरिक प्रथा आहे· यल्लमा देवीच्या नावाने अनेक कथा प्रसिध्द आहेत· त्यांचा अर्थही सामान्य माणसांचे भय वाढविणारे, किंबहुना ती स्त्री या प्रथेत जखडली गेली पाहिजे· जीवनातील प्रत्येक गोष्टीचा संदर्भ देवाशी लावून सामान्य माणसांच्या मनात भक्तीऐवजी भय निर्माण केले आहे, ते भय सुशिक्षितांच्या मनातही घर करून आहे·

एखाद्याच्या जन्माआधी घरातील कुणी नवस बोलल्याने मॅट्रिक शिकलेल्या तरूणाला "जोगता" व्हावे लागते. उपवास मोडल्याने खरूज होते असे अज्ञान प्रथेतून मान्य केले आहे.

लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधीने लोकांसाठी काम करावयाचे असते, पण आज वेश्यांच्या वस्तीसाठी आमदारांच्या बिल्डींग आहेत. पोलीस यंत्रणा वेश्यांच्याकडून हप्ते घेते, काही घरवाल्या विविध राजकीय पक्षांचे काम करतात व एक गठ्ठा मतासाठी राजकारणी या स्त्रियांच्या समस्येत लक्ष घालत नाहीत. किंबहुना त्याच परिस्थितीत रहाव्यात यासाठी महात्मा फुले प्रतिष्ठान सारख्याच्या कार्यकर्त्यांच्या कानात सगळे संदर्भ अडथळे आणत असतात.

"देवदासी प्रथा बंदी" विषयीचा कायदा १९३४ चा ब्रिटीशांनी केलेला कायदा आजही कर्नाटक सरकार किंवा महाराष्ट्र सरकार अंमलात आणत नाहीत. कलेक्टर तो कायदा वाचण्याची तसदीसुध्दा घेत नाही उलट कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाला हा सामाजिक प्रश्न आहे, तो प्रबोधनातून सोडवा असा सल्ला देतो. तर पोलीस अधिकारी उध्दट वागतो.

अत्याचारग्रस्त, उपरा, असुरक्षित मानवीसमूह या हलाखीच्या परिस्थितीत रोगांना, व्यसनांना बळी पडतो. थिएटरचं आवार तर बाई, बाटली, जुगार, काळाबाजार हाणामारी यांचा अड्डा तर इचलकरंजी काळा व्यवसाय व दोन नंबरचा पैसा यांनी मस्तवाल बनलेल्या काळाबाजारवाल्यांची आहे.

प्रचंड हुंडा ही प्रथा तर वेश्या व्यवसायाला पूरक कारण आहे.

कोल्हाटी जमात परंपरागत चालत आलेला व्यवसाय म्हणून "तमासगीर"पण स्वीकारतात. कलेला गौण स्थान प्राप्त होऊन शरीराला महत्त्व वाढल्याने या स्त्रियांचे शारीरिक शोषण सुरू झाले. पाटर्या वाढल्या थिएटर कमी पडू लागली, परंपरा सोडून शिक्षण, दुसरा व्यवसाय नाही, त्यामुळे या स्पर्धेत ही स्त्री थिएटर मालकाला बळी जाते.

परिस्थितीने व्यवसायात आलेल्या स्त्रियांच्या दुःखाचा शोध घेण्याऐवजी, मध्यमवर्गियांचे कुतूहल चालवेल असे साहित्य निर्माण करणे म्हणजे या पददलित स्त्रियांचे

एक प्रकारे शोषण करण्यासारखे आहे. बोगस डॉक्टर, फेरीवाले असे अनेकजण तिच्या संदर्भात येणारे शोषकच आहेत.

एकंदर परंपरा, सामाजिक, राजकीय संदर्भ हे या समूहांना प्रकाशाची वाट न दाखवता, अधिकाधिक खोलात या समूहांना रुजवतात. या माणसांना जीवनाचा खरा संदर्भ कधी लागतच नाही, तो संदर्भ लावून चांगल्या जीवनाचा अर्थ त्यांना समजावून सांगितला पाहिजे. त्यासाठीच अवचटांची लेखणी अविरत प्रयत्न करते आहे आणि ते तिचे सामर्थ्यही आहे.

**भाषाशैली :-**

अनिल अवचटांची भाषाशैली ही घटनांची, प्रसंगांची दखल घेणारी, त्याचा रिपोर्ताज लिहिणारी पण "धागे आडवे उभे" मध्ये ती समाजजीवनाचा एक मोठा भाग व्यापणा-या दुर्लक्षित, उप-या सतत अत्याचारग्रस्त अशा विशाल बनत चाललेल्या मानवसमूहाचा वेध घेणारी विशाल व्यापकता घेऊन आलेली आहे.

या मानवीसमूहाच्या निर्मितीक्षमतेला, जगण्याच्या उर्मीला मर्यादा पडतात. हा समूह जीवनमूल्यांअभावी गुदमरताना दिसतो ते गुदमरणे अवचटांना अस्वस्थ करते, त्यांना असे दबलेले जीवन म्हणजे माणसाच्या खूनापेक्षा भयंकर वाटते, या पार्श्वभूमीवर ते माणसातले माणूसपण जागे करून या समूहाच्या समस्याची तीव्रता कमी करू पाहतात.

अवचटांची लेखनशैली मानवीमूल्यांचा सखोल शोध घेणारी आहे. मूलगामी चिरंतन विचाराचा पिंड असणारी, मानवी जीवनमूल्ये, विचार सर्वांनी जपावेत असा आग्रह धरणारी त्यांची लेखनशैली आहे. ती स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही तत्वांचा ध्यास घेणारी आहे. आपण माणूस आहोत, भोवतालची ही सारी आपल्या सारखीच माणसं आहेत. आपल्या सारखेच त्यांचेही भावविश्व आहे. सर्वांसह हे भावविश्व हातात हात घालून फुलावे अशी त्यांची समाजजीवनाविषयीची उदात्त संकल्पना त्यांच्या लेखणीतून स्पष्ट होते.

देवदासी, तमासगीर स्त्री, हळद, यंत्रमाग कामगार यांच्या वाटयाला येणारे अपरंपार वेदनामय जीवन आणि सर्व बाजूने होणारे त्यांचे शोषण, अंतःकरणाला हात घालणा-या व मेंदूला विचारांच्या झिणझिण्या आणणा-या भाषेतून अभिव्यक्त करणारा

हा लेखक मराठी ललित गद्याला रेखीव करणारा आहे.

स्त्री कामगार यांची सर्व पातळ्यांवर होणारी ससेहोलपट तर अंतःकरणाचा थरकाप उडवते, डोळे सुन्न होऊन जाते, समाजातील प्रस्थापित उच्चभ्रू, श्रीमंत, व्यापारी अशा धनाढय वर्गियांच्याकडून आर्थिक, शारीरिक, मानसिक शोषणाचे ते बळी ठरतात. हे परखड वास्तव त्यांच्या समाजचिंतनातून आलेले आहे. त्यांच्या अनोख्या वैशिष्टयपूर्ण शैलीत ते वाचकाच्या मनापर्यंत जाऊन पोहोचते हेच त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्टय आहे.

## नित्याच्या जीवनातील भाषा :-

अवचटांची भाषा साधी, सरळ, सोपी नित्याच्या जीवनात वापरली जाते अशी आहे, त्यामुळे ती वाचकाला जवळची वाटते. मनात विश्वास निर्माण करते. नित्याच्या जीवनातील स्वतःच्या अनुभवाशी प्रामाणिक राहते. त्यामुळे त्या अनुभवांना अंगभूत व्यापकपणा आला आहे. हा मनाचा व्यापकपणा नित्य जीवनातील भाषेमुळे वाचकांच्या मनापर्यंत सहज पोहचतो. उदा. "आमच्या या छोटया मालकाला स्वप्नंही रंगीत पडत नाहीत. ती ब्लॅक अँड व्हाईटच पडतात. त्याच्या स्वप्नातही धर्मेन्द्र, हेमामालिनी येत नाहीत, तर पेठीवाला येतो, कुठं कापड सेकंडच निघालंय असं येतं..."[१७] किंवा "आत काम करनारा घ्या, बाहेर, समद्यांना तरास हायेच. मोटेच्या बैलावाणी ओढून ओढून पोटाचे नळ धरत्यात, आतडयाला पीळ पडतू. आत गेलेला गडी तर दिवसभर कायीच काम करू शकत न्हाई"[१८] हे बोलीभाषेतलं निवेदन त्या कामगाराच्या व्यथांचा पीळ वाचकांपर्यंत सहज पोहचवते.

त्यांच्या लेखनशैलीत वेश्यांच्या वस्तीतील हिंदी सहजपणे येते आणि आशयाला न्याय देण्यात यशस्वी होते.

अवचटांच्या भाषेत चिंतनशीलतेचा गाभा आहे, प्रसंग संपता संपता येणारे निवेदन हे चिंतनशीलतेची डुब घेऊन येते. उदा. वेश्यांच्या या धंद्यात आज असणा-या सुंदर मुली उद्या अशाच रोगजर्जर होणार, पण त्या समोरचं भविष्य न पाहण्याचे शिकत असाव्यात असा अभिप्राय, असे निवेदन करणारा हा लेखक लगेच शेवटचं वाक्य लिहून जातो, "संध्याकाळ झाली होती."[१९] त्या मुलींच्यासमोर फक्त अंधार होता. हे

सारं पाहिल्यानंतर होणारी स्वतःच्या मनाची, त्याबरोबर वाचकाच्या मनाचीही विषण्णता सूचकतेने इथे स्पष्ट होते· हे अल्पाक्षरत्व त्यांच्या लेखनशैलीचे वैशिष्ट्य आहे· किंवा "या विषण्ण दिवाळीचा निरोप घेतला आणि परतलो"[४०] इथे लेखक थांबतो नि वाचकाच्या मनात विचार सुरू होतात, अशी ही समाजचित्रे तो रेखाटतो ते स्वतःच्या भावनेसह· "पिक्चरच्या आधाराने हे लोक निर्णय घेतात· रात्रंदिवस पिक्चरच जगतात· किती परतंत्र जिणं हे ।"[४१] किंवा, "रोज अनेकांबरोबर सेक्स केल्याने त्या स्त्रीचं मनच बदलून जात असेल ?"[४२] किती प्रचंड गंभीर नि मनाचा खोलवर शोध घेणारा हा गहन प्रश्न, वाचकाच्या माणूसपणालाच धक्का देऊन जातो·

अचूक निरीक्षण, सहज प्रत्यंतर आणि तटस्थपण, सूचक चित्रण ही अवचटांची लेखनशैलीची वैशिष्टये आहेत· "जवळ तंबू, दो-या, तरूण मुली अशा नाशवंत वस्तू असतात·"[४३] परिस्थितीच्या दडपणाखाली सचेतन आणि अचेतन वस्तू सारख्याच बनतात· त्यांच्यावरील अन्याय व अगतिकता स्पष्ट होते, "भाजी बाजाराचं स्वरूप आलं होतं फरक एवढाच की इथं भाजी स्वतःच ओरडत होती·"[४४] हे घृणास्पद जीवनाचे रेखाटन वाचकाला अस्वस्थ करते·

अवचटांचे अल्पाक्षर चित्रमय कथन मराठी ललित गद्याला एक आगळेच वैचारिक व ललित असे दुहेरी पातळीचे समर्थ रूप देऊन जाते·

संवादावर भर :-

संवादात्मक निवेदन हेही अवचटांच्या भाषेचे वैशिष्टय आहे· मानवी जीवनातल्या सुसंवादावर विश्वास ठेवणारा हा लेखक माणसांच्या मनातील दुःखाचा वेध घेतो· एका माणसांशी, मानवसमूहाशी संवाद साधत समस्येचा, जीवनमूल्यांचा सुसंगत शोध घेताना दिसतो· उदा·

"ही घरवाली आई असते, ही या मुलांना कशी वागवते हो ?" "ती नुसती म्हणायला आई आहे, पण पोरींना अगदी पिळून काढते· पाच रूपायातले तीन रूपये काढून घेते· खरं पाहिलं तर पाच रूपायातले निम्मे घेते, त्यात घरभाडं, बत्ती भाडं, दिलेलच असतं· पण सकाळी पाहयलं, बत्तीभाडं वेगळं घेते ते·"

"बरं, घरवालीची इन्व्हेस्टमेंट काय, मुलींची किंमत ही ?" "अहो ती किंमतही या मुलीकडनं ही आई हप्त्याहत्याने वसूल करतेच·"

मला सुरूवातीला काही कळेना, पण नंतर लक्षात आले, मी थक्कच झालो· म्हणजे ही घरवाली या मुलीला विकतही घेत नव्हती· ती मुलगी या बाजारात येऊन स्वतःला विकून घेत होती· बाप रे !"[४५]

या धक्कादायक वास्तव स्वरूपासह, शोषणाचा संगतवार शोध नाट्यमयरीतीने वाचकासमोर मांडला आहे·

"तू कोण आहेस ?"

"मी आई हाय - यल्लूआई·"

जोगतिणी आणखीनच बावरल्या·

गौराबाई म्हणाल्या, "ठीक आहे, यल्लूआई तू इथं आलीस ते बरं झालं· सांग, आमची अशी दशा का केलीस ?"

"माझी चेष्टा चाललीय इथं···मी सहन करणार नाही···"

"यल्लूआई, तू जगाची आई ना, मग आम्हां महारमांगांच्या मुलीच का तुला आवडतात ? वाण्या-बामणाच्या मुलींना तू का जट आणत नाहीस? याचं उत्तर दे आधी !"

सभेतल्या जोगतिणींच्या चेहऱ्यावर परत एकदा टवटवी आली·"[४६]

एका देवदासीमधील मानसिक धीटपणा या संवादातून स्पष्ट होतो, तिच्यातला विद्रोह, नकार व बंड करण्याची वैचारिक तयारी स्पष्ट होते, तेव्हा परिवर्तनाच्या चळवळीला गती येताना दिसते·

"मी सुर्याजीला म्हटलं "भरपाई किती मिळते अशावेळी ?"

तो म्हणाला "भाव ठरलेले आहेत, डोळ्याचा भाव दहा हजार रूपये, बोटाच्या एकेक पेराचा भाव पंधराशे रूपये· तेही पगारावर असतं· पगार जास्त असेल तर जास्त भाव, कमी असेल तर कमी·"

मी हादरलोच, मंडईतल्या भाजीचे भाव करावेत तसे अवयवांचे भाव असतात हे ऐकवत नव्हतं· जास्त पगारवाल्यांचा अवयव जास्त महाग हेही अजब वाटलं·"[४७]

मानवतेच्या विचारात न बसणारे पण व्यवहारात दिसत असणारे वास्तव स्पष्टपणे या संवादातून वाचकापुढे मांडले आहे· भाजीच्या भावाप्रमाणे शरीराच्या अवयवाचे

त्या कामगाराच्या स्तरावरून भाव असावेत हे मुळात तर्काला पटणारे नाही· पण हे असे आहे, या विषम समाजरचनेतील हा अत्याचारग्रस्त मानवसमूह पाहून, संवाद ऐकून वाचक सुन्न होऊन जातो·

वाचकाला चटका लावणारी, जीवनमूल्यांचा ध्यास घेणारी, गहि-यामनाची, अल्पाक्षरत्व असणारी, आनंद जपणारी वाचकाच्या अंतःकरणात हात घालून अंतर्मुख करून खिळवून ठेवणारी अनिल अवचटांची गतिमान लेखनशैली "धागे आडवे उभे" मध्ये अभिव्यक्त होते·

"त्र्यंबक बाजूजी अत्रेंचा "गावगाडा", माटयांचे "उपेक्षितांचे अंतरंग", विभावरी शिरूरकरांची "बळी", इरावती कर्व्यांचे "परिपूर्ती" या व्यापक परंपरेशी नाते सांगणारे अनिल अवचट यांचे "धागे आडवे उभे" हे पुस्तक १९८६ सालातले एक लक्षणीय पुस्तक आहे·"[४८] असे रेणू देशपांडे नमूद करून, "अशा स्वरूपाचे लेखन करण्यातली अनिल अवचट यांची हातोटी, नेमक्या तपशिलांची प्रभावी मांडणी, लेखनाला सतत स्पर्श करणारा परखड आत्मपरीक्षणाचा स्पर्श आणि माणूसपणाच्या सूनामुळे येणारी गंभीर, जागृत आणि खरी अस्वस्थता· या सर्व वैशिष्टयांना अधोरेखित करणारे "धागे आडवे उभे" वाचकाला गुंतवून कासावीस करणारे आहेत·"[४९] असे प्रतिपादन करतात· तर "सामाजिकतेची जाणीव असलेले अनिल अवचट पुढे गतायुष्यातील आणि वर्तमान वास्तवातील आठवणी आणि अनुभव काहीशा मौलिक लालित्यानिशी टिपू लागले· त्यामुळे मराठी ललित निबंधाला एक वेगळे परिमाण लाभले· अनुभव म्हणून त्यात विविध ताण सहज येतातच, पण त्यांना अवचटांच्या जीवनदृष्टीमुळे सामाजिक अर्थपूर्ण वास्तवाचेही परिमाण लाभते· ही त्या अनुभवाची ताकद फार मोठी आहे· या दिशेने येत्या काही वर्षात ललित गद्य पुढे झेपावेल असे वाटण्याइतके ते लेखन प्रभावी आणि वाङ्‌मयक्षेत्राचे लक्ष वेधून घेण्याइतके समर्थ झाले आहे"[५०] असा विश्वास डॉ·आनंद यादव प्रतिपादन करतात· अनिल अवचटांच्या ललित गद्य लेखनात प्रभावित होणारे जीवनाचे सामाजिक अंग, जीवनाशयाची ताकद, वर्तमान सामाजिक वास्तव यामुळे ते वाचकाला अधिक जवळचे वाटते, यामध्येच त्यांच्या ललित लेखनाचे सामर्थ्य आहे·

निष्कर्ष :-

"धागे आडवे उभे" मधील अनिल अवचट यांचे ललित लेखन हे "वेश्या", स्त्री, तमासगीर स्त्री, देवदासी स्त्री, सिनेमा थिएटर कामगार, हळद कामगार, यंत्रमाग

कामगार या सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणा-या मानवसमूहांच्या आयुष्याचे काटेरी वस्त्राचे आडवे उभे धागे वाचकांपुढे उलगडणारे आहे. प्रचलित समाजव्यवस्थेमध्ये या मानवसमूहांच्या निर्मितीक्षमतेचा जगण्याच्या उर्मीचा नाश होऊन, परिस्थितीच्या दडपणाखाली चिरडून होणारे माणूसपणाचे खून आपण पाहू शकतो किंवा पहायचे नाकारू शकतो पण हे फार काळ नाही, "माणूस" म्हणूनही शोभणारे नाही, अवचटांचा विश्वास माणसांच्या अंतःकरणातील माणूसपणावर आहे. ते माणूसपण जागे करूनच ही परिस्थिती बदलली पाहिजे असा त्यांचा निर्धार आहे. या निर्धारात त्यांना शक्य तितक्या माणसांना सहभागी करून घ्यावयाचे आहे, आपल्या बरोबरीने जगत असलेल्या रक्तमासाच्या माणसांना कसे जगावे लागते, कोणकोणत्या प्रकारचे भोग त्यांच्या वाटयाला येत असतात याची जाणीव त्यांना समाजमनाला करून द्यावयाची आहे, कारण जी दुःख मनुष्यनिर्मित आहेत, त्यांचा निरासही तो करू शकतो या वाक्यातील विश्वासाने ही दुःखे निर्माण करणारी प्रचलित समाजयंत्रणाच बदलण्याचे आव्हान आजच्या सुजाण, सुशिक्षित तरूणांनी स्वीकारले पाहिजे हा आग्रह धरणा-या अवचटांच्या लेखनातील जाणिवांच्या सूचना "धागे आडवे उभे"च्या मुखपृष्ठ, शीर्षक, रेखाचित्र, अर्पण पत्रिका, प्रस्तावना यामधून वाचकाला मिळतात. सर्व थरांमधल्या सुजाण, सुशिक्षित तरूणांपुढे ते समाजजीवनाचा आरसा धरून, या समाज-जीवनात स्वातंत्र्य, समता, बंधुता या जीवनमूल्यांचा अभाव कसा माणूसपण कोमेजून टाकतो आहे,याच्या संबंधीचे वास्तववादी चिंतनाभिमुख विचार मांडताना, अज्ञान, अंधश्रध्दा, रीतीरिवाज हे सामान्य माणसांच्या जगण्याला कसे अधिक हलाखीचे बनवतात, प्रचलित विषम समाजव्यवस्था घट्ट करण्याला हातभार लावतात याचे आशयपूर्ण दर्शन अनिल अवचटांच्या लेखनाने केले आहे. सतत अत्याचारग्रस्त जीवन जगणारे हे मानवसमूह म्हणजे समाजातील दबलेल्या माणसांचे प्रत्ययकारी दर्शन आहे. ही माणसे जगण्याच्या धडपडीत त्यांच्या ग्रामीण जीवनासह शहरात येत आहेत नि एक विसंगतिपूर्ण असे सामाजजीवनाचे चित्र अवचटांच्यातील चित्रकार मोठया ताकदीने समाजमनाच्या विशाल कॅनव्हॉसवर रेखाटतो, त्यामध्ये परदुःख पाहून गहिवरणारे कार्यकर्ता अवचटांचे मन आहे, या सामान्य माणसांच्या जगण्याला मर्यादा पाडणारे विविध संदर्भ निर्भयपणे ते समाजासमोर मांडतात. हे सारे मांडत असताना त्यांची लेखनशैली सोपी, सरळ प्रवाही, पण परखड अशीच आहे. सामाजिक अंगाने वस्तुनिष्ठ लेखन करणा-या अनिल अवचटांच्या "ललित गद्य" लेखनात "मराठी ललित गद्याचा" विकास झालेला दिसतो.

संदर्भ टीपा :-

१ अवचट अनिल, धागे आडवे उभे, ४प्रस्तावना४ मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई· प·आ·१९८६ , पृ·६

२ तत्रैव, पृ·१२६

३ तत्रैव, ४प्रस्तावना४, पृ· २

४ तत्रैव, पृ·७

५ तत्रैव पृ·६

६ सोमण अंजली, ललित, जून १९९० , पृ· ११

७ अवचट अनिल, धागे आडवे उभे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई·प·आ· १९८६ पृ·८

८ तत्रैव, पृ· ३४

९ आलोचना, मे १९८८ पृ· ८,९

१० अवचट अनिल, धागे आडवे उभे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प·आ·१९८६ पृ· ३२

११ तत्रैव, पृ·२२

१२ तत्रैव, पृ· १५६

१३ तत्रैव, पृ· ३३

१४ तत्रैव, पृ· ३४

१५ तत्रैव, पृ· ७९

१६ तत्रैव, पृ· १२१

१७ तत्रैव, पृ· १०

१८ तत्रैव, पृ· ११

१९ तत्रैव, पृ· २२

२० तत्रैव, पृ· ११६, ११७

२१ तत्रैव, पृ· ११७

२२ तत्रैव, पृ· ११७

२३ तत्रैव, पृ· १३

२४ तत्रैव, पृ· ७२

२५ तत्रैव, पृ. ९४

२६ तत्रैव, पृ. २९

२७ तत्रैव, पृ. १५६

२८ तत्रैव, पृ. १५६

२९ तत्रैव, पृ. ९३,९४

३० तत्रैव, पृ. ११४

३१ तत्रैव, पृ. ७४

३२ तत्रैव, पृ. ३

३३ तत्रैव, पृ. ५८

३४ तत्रैव, पृ. ८५

३५ तत्रैव, पृ. ८८

३६ पळशीकर वसंत, ललित, मे-जून १९८७ पृ.६९

३७ अवचट अनिल, धागे आडवे उभे, मॅजेस्टिक प्रकाशन, मंबई, प.आ.१९८६ पृ. १४२

३८ तत्रैव, पृ. ८९

३९ तत्रैव, पृ. १७

४० तत्रैव, पृ. १८

४१ तत्रैव, पृ. १७

४२ तत्रैव, पृ. १९

४३ तत्रैव, पृ. ७४

४४ तत्रैव, पृ. २९

४५ तत्रैव, पृ. १३

४६ तत्रैव, पृ. १००

४७ तत्रैव, पृ. १३३

४८ देशपांडे रेणू, ललित, मे-जून १९८७ पृ. ६६

४९ तत्रैव, पृ. ६६

५० कुलकर्णी अ.अ. (प्रका.सं.), प्रदक्षिणा (खंड दुसरा), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प.आ १९९१, पृ. २६७